






# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १४१ * नांदेड * गुरूवार, दि. २८ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# विधानपरिषदेचे जागावाटप मुंबईतच अंतिम होणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)–** संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विधानपरिषद निवडणुकांच्या १७ जागांसाठी महायुतीमधील जागावाटपाचा तिढा जवळपास सुटला असून केवळ २ ते ३ जागांवर अंतिम निर्णय होणे बाकी आहे. हा जागावाटपाचा तिढा दिल्लीत नव्हे, तर मुंबईतच मित्रपक्षांचे प्रमुख नेते एकत्र बसून सोडवतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी स्पष्ट केले आहे. महायुतीमध्ये सध्या नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जागांवरून शिवसेनेसोबत (शिंदे गट), तर पुण्याच्या जागेवरून राष्ट्रवादी काँग्रेससोबत (अजित पवार गट) भाजपची चर्चा सुरू असून, हा तिढा लवकरच सुटेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



नवी दिल्लीत केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांच्यासमवेत साखर उद्योगासंदर्भातील एका महत्त्वाच्या बैठकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुतीचे इतर प्रमुख नेते उपस्थित होते. या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी विधानपरिषद निवडणुकीच्या जागावाटपावर भाष्य केले. विधानपरिषद निवडणुकीबाबत आमचे जवळपास एकमत (अ‍ॅग्रीमेंट) झालेले आहे. फक्त नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जागा आम्हाला मिळाव्यात, असा आमचा शिवसेनेकडे आग्रह आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसने आमच्याकडे पुण्याच्या जागेची मागणी केली आहे. सध्या याच जागांवरून चर्चा अडकली असली, तरी आम्ही ती सकारात्मकतेने सोडवून घेऊ, असे फडणवीस म्हणाले. महायुतीसमोरील जागावाटपाचा 'कठीण पेपर' संपला असून आता केवळ 'सोपा पेपर' सोडवून त्यावर 'टीकमार्क' करणे बाकी आहे, असेही त्यांनी सांगितले

महायुतीच्या संभाव्य जागावाटपानुसार, १७ पैकी सर्वाधिक १२ जागांवर भाजप निवडणूक लढवण्याची चिन्हे असून, शिवसेनेला ३ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला २ जागा मिळण्याची चर्चा आहे. या संदर्भात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, विधानपरिषदेच्या बाबतीत इतक्या आधी गोष्टी निश्चित होत नसतात, त्या वेळेवरच होतात. त्यामुळे उमेदवारी अर्ज भरण्याच्या अंतिम टप्प्यातच जागावाटप आणि उमेदवारांच्या नावांची अधिकृत घोषणा मुंबईतूनच केली जाईल.

## केरळचे माजी सीएम पी. विजयन यांच्यावर ईडीची छापेमारी

**तिरूअनंतपूरम (प्रतिनिधी)–** केरळमधील तिरुवनंतपुरम येथे माजी मुख्यमंत्री पी. विजयन यांच्या निवासस्थानी छापा टाकण्यासाठी आलेल्या अंमलबंदी संचालनालयाच्या (ईडी) पथकावर विजयन यांच्या समर्थकांनी हल्ला केला. १२ सदस्यीय पथकाने बुधवारी बेकरी जंक्शन येथील विजयन यांच्या निवासस्थानी छापा टाकला. त्यांच्या मुलीच्या 'एक्झालॉजिक सोल्युशन्स' या आयटी कंपनीशी संबंधित मनी लॉड्रिंग प्रकरणात हे छापे टाकण्यात आले. हे प्रकरण 'कोचीन मिनरल्स अँड रुटाइल लिमिटेड' (सीएमआरएल) द्वारे केलेल्या मनी लॉड्रिंगशी संबंधित आहे.

ईडीचा तपास रद्द करण्याची मागणी कंपनीने केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, मंगळवारी केरळ उच्च न्यायालयाने सीएमआरएलची याचिका फेटाळली. ईडीने या प्रकरणात २०२४ मध्ये गुन्हा दाखल केला होता. सीएमआरएल नावाच्या कंपनीने २०१८-१९ दरम्यान विजयन यांची मुलगी टी. वीणा यांच्या 'एक्झालॉजिक सोल्युशन्स' या आयटी कंपनीला छ१.७२ कोटी दिले. कोणतेही सॉफ्टवेअर किंवा आयटी सेवा न देता, हे पैसे बनावट खर्च म्हणून देण्यात आले असल्याचा आरोप आहे. हा खुलासा झाल्यानंतर, ईडीने पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

# आमदारकीसाठी अनेकजण इच्छुक: विधानपरिषद निवडणुकीसाठी २५ अर्जांची विक्री, १ अर्ज दाखल

## आजी-माजी आमदार-खासदार प्रयत्नात

**नांदेड (प्रतिनिधी)–** नुकत्याच जाहीर झालेल्या विधान परिषद नांदेड स्थानिक प्राधिकार मतदार संघाच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दि. २७ मेपर्यंत इच्छुकांनी २५ उमेदवारी अर्ज घेतले आहेत. २७ मे रोजी हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे पुत्र कृष्णा पाटील आष्टीकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर आष्टीकरांनंतर आता माजी खासदार तथा विद्यमान आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांचे पुत्र प्रवीण पाटील चिखलीकर आणि हिंगोलीचे माजी खासदार सुभाष वानखेडे यांचे पुत्र भास्कर वानखेडे या इच्छुकांनी उमेदवारी अर्ज घेऊन निवडणुकीत एन्ट्री केली आहे.



विधान परिषद निवडणुकीचा उमेदवारी अर्ज दाखल करताना खा. नागेश पाटील आष्टीकर यांचे पूत्र कृष्णा पाटील दिसत आहेत.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीत अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस सोमवारी प्रारंभ झाला आहे. सलग २ निवडणुका जिंकणाऱ्या माजी आ. अमरनाथ राजूरकर यांचा कार्यकाळ २०२२ मध्ये संपल्यानंतर ही निवडणूक झाली नव्हती. निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर आता या निवडणुकीत राजूरकर यांना पुन्हा उमेदवारी मिळेल का? सर्वांचे लक्ष लागले आहे. एकूणच ही निवडणूक आता महायुती म्हणून लढविली जाते की, आणखी वेगळी राजकीय समीकरणं पुढे येतात, हाही कळीचा विषय आहे. यामध्ये महाविकास आघाडीकडून कोण पुढे आणले जाईल, याकडेही लक्ष आहेच. भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदार संघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे.

१ जून ही अर्ज भरण्याची अंतिम तारीख आहे. २ रोजी अर्जांची छाननी होईल तर ४ जून ही अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. त्यावेळी खरे चित्र स्पष्ट होणार आहे. दरम्यान, या निवडणुकीकरिता उमेदवारी अर्ज २५ मेपासून घेण्यात आले आहेत. २५ मे रोजी कृष्णा नागेश पाटील, नागेश पाटील आष्टीकर हस्ते कृष्णा पाटील, राजेश्वर भाऊराव पावडे हस्ते अभिलाष पावडे, अ‍ॅड. सुरेंद्र धनाजीराव घोडजकर, पंकज माणिकराव गायकवाड, जयप्रकाश दत्ता कानगुले यांनी तर २६ मे रोजी मोहनराव हंबर्डे हस्ते राजू मोरे, अमरनाथ अनंतराव राजूरकर हस्ते अनिल पाटील शेळके, डॉ. भगवान शंकरराव मनुरकर, बालाजी रामराव राठोड, दिगंबर टोपाजी लखमावाड, विजय हिराचंद येवणकर, ज्योतिबा जयराम खराटे हस्ते प्रशांत सुरेशराव कोरडे, करण विनोद एंड्रलवार हस्ते किशोर मोहनराव बोलेनवार, सत्यपाल भागोजी सावंत, सरचिटणीस भारतीय जनता पार्टी महानगर नांदेड हस्ते विजय हिराचंद येवनकर, श्रीकांत मधुकर देशमुख यांनी तसेच २७ मे रोजी रमेश नामदेव भालेराव, शिवसेना शिंदे गट भास्कर सुभाष वानखेडे, प्रवीण प्रतापराव चिखलीकर, राजू माधव कुडके अशा २५ जणांनी अर्ज घेतले. दरम्यान, २७ मे रोजी कृष्णा नागेश पाटील यांनी आपल्या उमेदवारीचा अर्ज दाखल केला आहे. या निवडणुकीत भाजपचे संभाव्य उमेदवार अमरनाथ राजूरकर यांच्यासोबत लढत देण्यासाठी हिंगोलीचे खासदार पुत्र कृष्णा आष्टीकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर आष्टीकरांनंतर आता माजी खासदार पुत्र प्रवीण पाटील चिखलीकर व भास्कर वानखेडे या इच्छुकांनी उमेदवारी अर्ज घेऊन निवडणुकीत एन्ट्री केली आहे. यामुळे राजकीय गोटात रंगतदार चर्चा सुरु झाली आहे.

## जनगणनाकामी असणाऱ्या चार शिक्षकांचा मृत्यू

**पुणे (प्रतिनिधी)–** सध्या शाळांना उन्हाळ्याची सुट्टी लागली असतानाही शिक्षकांची शाळा सुरुच असल्याचं दिसून येत आहे. यंदा उन्हाळ्याच्या सुट्टीत शिक्षकांना जणगनणेचं काम कराव लागत असल्याने भरउन्हात दारोदारी भटकंती होत आहे. त्यातच, कामाच्या तणावाने काही शिक्षकांमध्ये नाराजीचा सूरही पाहायला मिळत आहे. दरम्यान, राज्यात जनगणना कामी असलेल्या चार शिक्षकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती, आता, आणखी एका शिक्षिकेचा अपघाती मृत्यू झाल्याचे समोर आलं आहे.

# डी.के. शिवकुमार कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री?

**बंगळुरू (प्रतिनिधी)–** कर्नाटकच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठा सत्तानाट्याचा ट्विस्ट पाहायला मिळत आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्याच्या चर्चांना वेग आला असतानाच उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्याकडे मुख्यमंत्रीपद जाणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. आता या सगळ्यात आणखी एक नवा 'फॉर्म्युला' समोर आला असून राज्यात तब्बल ४ उपमुख्यमंत्री नेमण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, दलित, ओबीसी, लिंगायत आणि अल्पसंख्याक समाजातून प्रत्येकी एका नेत्याला उपमुख्यमंत्रीपद दिलं जाऊ शकतं. दलित गटातूनजी परमेश्वरा आणि प्रियांक खर्गे यांची नावं चर्चेत आहेत. ओबीसी गटातून मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचे पुत्र यतींद्र सिद्धरामय्या यांचं नाव पुढे आलं आहे. लिंगायत समाजातून च. इ. पाटील आणि ईश्वर खांद्रे यांना संधी मिळू शकते. तर अल्पसंख्याक गटातून के.जे. जॉर्ज, यू.टी. खादर आणि जमीर अहमद खान यांच्या नावांची जोरदार चर्चा सुरू आहे.

दरम्यान, गुरुवारी बेंगळुरूमधील 'कावेरी' या सरकारी निवासस्थानी सिद्धरामय्या आणि डीके शिवकुमार



यांच्यात होणाऱ्या ब्रेकफास्ट मिटिंगमुळे राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. या बैठकीनंतर दोन्ही नेते संयुक्त पत्रकार परिषद घेऊन नेतृत्व बदलाबाबत भूमिका स्पष्ट करू शकतात, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे डिसेंबर २०२५ मध्येही दोन्ही नेत्यांमध्ये अशीच चर्चित ब्रेकफास्ट डिप्लोमसी झाली होती. त्या वेळी काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रीपदाच्या वाटपावरून सुरू असलेल्या चर्चांदरम्यान पक्षाने एकजुटीचा संदेश देण्याचा प्रयत्न केला होता.

सूत्रांच्या दाव्यानुसार, राहुल गांधी यांनी सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्रीपद सोडण्याचा सल्ला दिला असून डीके शिवकुमार यांना मुख्यमंत्री करण्याची तयारी सुरू आहे. बदल्यात सिद्धरामय्या यांना राष्ट्रीय राजकारणात मोठी भूमिका आणि त्यांचे पुत्र यतींद्र यांना उपमुख्यमंत्रीपद देण्याचा प्रस्ताव चर्चेत असल्याचं सांगितलं जात आहे.

# सुप्रीम कोर्टाचा महत्त्वाचा निकाल, एसआयआर मोहीम वैध असल्याचा निर्वाळा, निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे समर्थन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीवेळी वादग्रस्त आणि प्रचंड चर्चेचा विषय ठरलेल्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण अर्थात एसआयआर मोहीम वैध असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.



सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने यासंदर्भात बुधवारी महत्त्वपूर्ण निकाल सुनावला. यावेळी खंडपीठाने आपले निरीक्षण नोंदवताना म्हटले की, निवडणूक आयोगाने आपल्या अधिकाराचा वापर केला आहे. आपल्या अधिकाराच्या कक्षेबाहेर त्यांनी काहीही केलेले नाही. त्यामुळे एसआयआर मोहीमेला असंवैधानिक ठरवता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर संदर्भातली याचिकांवर सुनावणी झाल्यानंतर यासंदर्भातील निर्णय राखून ठेवला होता. या निकालात सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर मोहीम वैध असल्याचा निकाल दिला. या प्रक्रियेला चुकीचे ठरवता येणार नाही. मतदार याद्यांचा फेरआढावा घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. लोकप्रतिनिधी कायदा १९५० नुसार हा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. विशेष मतदार यादी पुर्ननिरीक्षण करण्याचे आणि सगळ्या मतदार याद्यांचे पुनरावलोकन करण्याचे अधिकार घटनेने दिले आहेत. संविधानातील निवडणूक आयोगाशी संबंधित कलमांमध्ये अनुच्छेदात लिहलं आहे, निवडणूक आयोग मतदार यादी तयार करेल आणि तिची फेररचना करेल. त्यामुळे एसआयआर मोहीम वैध ठरते, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. **(पान ६ वर...)**

# ड्रेनेज कामाचे निमित्त! शहरातील चांगले रस्ते फोडण्याचे सत्र सुरूच!

**नांदेड (प्रतिनिधी)–** ड्रेनेज कामाचे निमित्त करून शहरातील चांगले रस्ते फोडण्याचे सत्र सुरूच आहे. महापालिकेच्या प्रभाग क्रमांक २० मधील असर्जन नाका ते वाघाळा ड्रेनेज लाईन खोदल्यामुळे चांगला डांबरीकरण रस्ता नादुरुस्त झाला आहे. गेल्या वर्षापासून परिसरातील अनेक भागातील नागरिकांचे बेहाल होत असून तात्काळ रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी मनपा आयुक्त, महापौर व परिसरातील सर्व नगरसेवक यांच्याकडे परिसरातील नागरिकांनी केली. या मागणीकडे दुर्लक्ष झाल्याने आगामी पावसाळ्यात मात्र नागरिकांसह वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागणार आहे.

महानगरपालिका प्रभाग क्रमांक २० मधील त्रिमूर्तीनगर, विठ्ठलनगर, साईबाबानगर, श्रीरामनगर, सिद्धिविनायकनगर येथे जाण्यासाठी रस्त्याची अशी दुरवस्था झाली आहे. सदरील परिसरात पोलीस विभागातील कर्मचारी, वैद्यकीय सेवा, डॉक्टर, सैन्य दलातील सैनिकाचे कुटुंबीय राहतात. नादुरुस्त रस्त्यामुळे नोकरीवरील कर्मचारी, शालेय विद्यार्थी व परिसरातील नागरीकांचे येणे-जाणे अवघड झाले आहे. ड्रेनेज लाईन टाकली परंतु कनेक्शन देण्यात आली नाही. काही दिवसांपुर्वी परिसरातील नागरिकांनी स्वखर्चाने हा रस्ता दुरूस्त केला होता. परंतु या रस्त्यावरून अवजड वाहनांची ये-जा चालू असल्याने पुन्हा रस्ता खराब झाला आहे. गेल्या एक वर्षापासून ड्रेनेज लाईनसाठी चांगला रस्ता खोदण्यात आला आहे. त्यानंतर रस्ता परत दुरूस्त न करता तसाच सोडल्यामुळे परिसरातील अनेक नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यासह रस्त्याच्या दुरावस्थेमुळे वाहने अडकून पडणे यासह अनेक समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत महानगरपालिका आयुक्त व लोकप्रतिनिधी तसेच महानगरपालिकेतील संबंधित विभागाचे अधिकारी यांना वारंवार निवेदनाद्वारे कळविण्यात आले असून अद्यापही याकडे दुर्लक्ष करण्यात आले असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पावसाळ्याचे दिवस येऊन ठेपले असून चांगला असलेला डांबरीकरण रस्ता ड्रेनेजसाठी खोदल्यामुळे खराब झाला असून सदरचा रस्ता पूर्ववत करावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## 'नीट' पेपरफुटीप्रकरणी आणखी दोघांना अटक

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशभरात खळबळ उडवणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणाची व्याप्ती दिवसागणिक वाढत असून 'नीट' पेपरफुटी प्रकरणी सीबीआय कडून राज्यभरात मोठ्या कारवाईचं सत्र सुरु आहे. अशातच आता या प्रकरणात आणखी दोघांनां अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणातील ही बारावी आणि तेरावी अटक आहे. गॉड म्हणून नंबर सेव्ह केलेल्या तेजस शाह या विद्यार्थ्याला पुण्यातून अटक करण्यात आली आहे. या विद्यार्थ्याने मनिषा हवालदारकडून पेपर घेतल्याचे उघड झाले आहे. दरम्यान, या प्रकरणातील तेरावी अटक सुद्धा महाराष्ट्रातूनच करण्यात आली आहे. पुण्यातून सीबीआयने अटक करण्यात आलेला हा आरोपी बालरोगतज्ज्ञ असून डॉ. मनोज शिरुरे असं त्याच नाव आहे.






# जमीन विकून निवडणूक लढलेल्या निष्ठावान कार्यकर्त्याला खा. श्रीकांत शिंदे यांनी दिला आधार

## लोकप्रतिनिधीची संवेदनशीलता; आर्थिक संकटकाळात कार्यकर्त्याच्या पाठीशी उभे राहून परत मिळवून दिली शेती

**भोकर (प्रतिनिधी)–** राजकारणात आजवर अनेक नेते आणि कार्यकर्त्यांची नाती पाहिली गेली आहेत. मात्र, जिथे सत्तेच्या राजकारणात स्वार्थाला प्राधान्य दिले जाते, तिथे एका सामान्य कार्यकर्त्याच्या निष्ठेची दखल घेत त्याला पुन्हा सन्मानाने उभे करण्याचे आदर्श उदाहरण समोर आले आहे. भोकर येथील शिवसेनेचे तालुकाप्रमुख माधव वडगावकर यांच्या बाबतीत घडलेली घटना खऱ्या अर्थाने माणुसकीचा नवा वस्तुपाठ घालून देणारी ठरली आहे.

भोकर नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिवसेनेचे निष्ठावान कार्यकर्ते आणि तालुकाप्रमुख माधव वडगावकर यांनी पक्षाची उमेदवारी लढवली होती. निवडणुकीच्या खर्चासाठी आर्थिक चणचण असतानाही त्यांनी डगमगून न जाता आपली स्वतःची शेती विकून निवडणुकीचा खर्च केला. पूर्ण ताकदीनिशी आणि तळमळीने त्यांनी निवडणूक लढवली, मात्र दुर्दैवाने अत्यंत निसटत्या फरकाने (८०-९० मतांनी) त्यांचा पराभव झाला. हा पराभव केवळ एका व्यक्तीचा नव्हता, तर एका निष्ठेचा होता.

### संवेदनशीलता आणि मदतीचा हात

नांदेड, हिंगोली आणि परभणी येथील आढावा बैठकीदरम्यान ही बाब खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या निदर्शनास आली. कार्यकर्त्याच्या संघर्षाची आणि निष्ठेची कथा ऐकून



डॉ. श्रीकांत शिंदे यांनी क्षणाचाही विलंब न लावता वडगावकर यांना स्वतः जवळ बोलावले. तिथे कोणताही राजकीय बडेजाव नव्हता, तर होती ती फक्त एकमेकांबद्दलची आत्मीयता. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी वडगावकर यांची कैफियत शांतपणे ऐकून घेतली. त्यांच्या डोळ्यांतील अश्रू पाहून डॉ. शिंदेंनी त्यांना आश्वासित केले आणि अवघ्या आठ दिवसांत त्यांना ठाणे येथे बोलावून घेतले.

डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केवळ वडगावकर यांचे सांत्वन केले नाही, तर निवडणुकीचा खर्च आणि विकलेल्या शेतीचे पैसे देऊन त्यांना आर्थिक मदत केली. या मदतीमुळे माधव वडगावकर यांना आपली विकलेली शेती पुन्हा परत मिळवणे शक्य झाले. ही मदत म्हणजे त्यांच्या संघर्षाला आणि त्यागाला दिलेली एक मोठी पोचपावतीच ठरली आहे.

### कार्यकर्त्याची कृतज्ञता

गेल्या ३०-३२ वर्षांपासून राजकारणात सक्रिय असलेल्या वडगावकर यांनी या अनुभवाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. ते म्हणाले, मी आयुष्यात अनेक नेते जवळून पाहिले आहेत, पण डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासारखी दानत असणारा नेता मी पहिल्यांदाच पाहिला आहे. त्यांनी यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खा. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर आणि जिल्हाप्रमुख विनय गिरडे यांचे आभार मानले.

राजकारणाच्या धकाधकीच्या जीवनात जिथे लोक सत्तेच्या मागे धावतात, तिथे आपल्या कार्यकर्त्याच्या कष्टाची आणि निष्ठेची किंमत ओळखून त्याला संकटातून बाहेर काढणाऱ्या नेतृत्वाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शिक्षणातील गळती : धोक्याचा इशारा

भारताला जगातील सर्वात मोठी युवा शक्ती लाभलेला देश म्हणून गौरवले जाते. आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये डेमोग्राफिक डिव्हिडंडची अर्थात लोकसंख्या वाढीचा फायदा याची भाषा केली जाते, अर्थतज्ज्ञ भारताच्या तरुण लोकसंख्येला विकासाचे इंजिन मानतात आणि उद्योगजगतही याच युवकशक्तीवर देशाच्या प्रगतीची स्वप्ने रंगवते. मात्र या चमकदार चित्रामागे एक भयावह वास्तव दडलेले आहे. नीती आयोगाच्या ताज्या अहवालाने हे वास्तव पुन्हा एकदा उघड केले आहे. देशातील लाखो मुले-मुली माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यावर शाळा सोडत आहेत. ही केवळ शैक्षणिक समस्या नसून राष्ट्राच्या भवितव्यावर आलेले गंभीर संकट आहे. अहवालानुसार माध्यमिक शिक्षणातील गळतीचे प्रमाण अजूनही चिंताजनक आहे. सुमारे ११.५ टक्के विद्यार्थी या टप्प्यावर शिक्षण अर्धवट सोडतात. म्हणजेच प्रत्येक दहा विद्यार्थ्यांपैकी एक विद्यार्थी शिक्षण व्यवस्थेबाहेर फेकला जातो. विशेष म्हणजे हा तोच काळ असतो, जेव्हा विद्यार्थ्यांना कौशल्य, तांत्रिक ज्ञान आणि व्यक्तिमत्त्व विकासाची सर्वाधिक गरज असते. पण आर्थिक, सामाजिक आणि व्यवस्थात्मक अडचणींमुळे त्यांचे शिक्षण अर्धवटच थांबते. गेल्या काही वर्षांत सरकारने प्राथमिक शिक्षणात प्रवेश वाढवण्यासाठी अनेक योजना राबवल्या. मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, मध्यान्ह भोजन, शाळांची उभारणी यामुळे प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांची नोंदणी वाढली. मात्र शिक्षणाची खरी कसोटी माध्यमिक स्तरावर लागते. कारण येथे गरीब कुटुंबांचे वास्तव मुलांच्या स्वप्नांवर मात करू लागते. अनेक कुटुंबां-मध्ये मुलांना घरखर्चासाठी कामावर पाठवले जाते. मुलींना घरकाम, सुरक्षिततेची चिंता, लवकर लग्न किंवा जवळ शाळा नसल्याने शिक्षण सोडावे लागते. ग्रामीण भागात अजूनही स्वच्छतागृहांची कमतरता, वाहतुकीचा अभाव आणि शिक्षणाबाबतची उदासीनता ही मोठी कारणे ठरतात. या परिस्थितीला केवळ गरिबी जबाबदार नाही, तर शिक्षण व्यवस्थेतील दोषही तितकेच कारणीभूत आहेत. आज अनेक विद्यार्थी शाळेत उपस्थित असले तरी शिक्षणाशी मानसिकदृष्ट्या तुटलेले दिसतात. अभ्यासक्रम कालबाह्य आहे, परीक्षा पद्धती पाठांतरावर आधारित आहे आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणारी वातावरणनिर्मिती होत नाही. शिक्षकांवरील वाढता ताण, अपुरी साधनसामग्री आणि ढासळती पायाभूत सुविधा यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उत्साह निर्माण होत नाही. परिणामी अनेक विद्यार्थी शाळा सोडण्यापूर्वीच शिक्षणापासून दुरावतात. आपल्या देशाला जर खऱ्या अर्थाने विकसित राष्ट्र व्हायचे असेल, तर केवळ उद्योगधंदे, महामार्ग किंवा डिजिटल प्रगती पुरेशी ठरणार नाही. जागतिक अर्थव्यवस्थेत टिकण्यासाठी कुशल मनुष्यबळ, तांत्रिक कौशल्य आणि नवोन्मेषी विचारांची गरज असते. शिक्षण अपूर्ण राहिल्यास देशातील युवक बेरोजगारी, असुरक्षित रोजगार आणि सामाजिक विषमतेच्या गर्तेत अडकतील. अशिक्षित किंवा अर्धशिक्षित तरुणांची वाढती संख्या ही सामाजिक अस्थिरते-लाही कारणीभूत ठरू शकते. यासाठी सरकारने केवळ आकडेवारी मांडून समाधान मानण्याऐवजी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. माध्यमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक प्रोत्साहन, ग्रामीण भागात दर्जेदार शाळांची उभारणी, मुलींसाठी सुरक्षित वाहतूक व वसतिगृहे, कौशल्याधारित शिक्षण आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम यावर भर द्यावा लागेल. शिक्षण अधिक व्यवहार्य, तंत्रज्ञानस्नेही आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी जोडलेले असणे आवश्यक आहे. पालक, शिक्षक, समाज आणि शासन या सर्वांनी मिळून शिक्षण टिकवण्याची सामूहिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. आज देशातील वर्गखोल्या रिकाम्या होत आहेत, आणि हे दृश्य कोणत्याही राष्ट्रासाठी धोक्याची घंटा आहे. एका बाजूला नवभारतची स्वप्ने दाखवली जात असताना दुसऱ्या बाजूला लाखो मुले शिक्षणापासून वंचित राहत असतील, तर विकासाच्या सर्व दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभे राहते. देशाचे भविष्य केवळ लोकसंख्येच्या संख्येवर नव्हे, तर त्या लोकसंख्येच्या शिक्षणावर आणि गुणवत्तेवर ठरत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांची शाळाबाहेर होणारी गळती रोखणे ही आता केवळ शैक्षणिक नव्हे, तर राष्ट्रीय प्राधान्याची बाब ठरली पाहिजे.

# भारताच्या क्रांतिकारी इतिहासातील सुवर्णपान : वि. दा. सावरकर



भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अनेक क्रांतिकारकांनी आपल्या त्याग, बलिदान आणि धैर्याने इतिहास घडविला. त्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वांमध्ये विनायक दामोदर सावरकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. स्वातंत्र्यवीर म्हणून ओळखले जाणारे सावरकर हे केवळ क्रांतिकारक नव्हते, तर ते राष्ट्रभक्त, साहित्यिक, समाजसुधारक, इतिहासकार आणि प्रभावी वक्तेही होते. त्यांच्या जीवनकार्यामुळे भारतीय क्रांतिकारी इतिहासात एक सुवर्णपान निर्माण झाले.

विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी भगूर येथे झाला. त्यांचे बालपण देशभक्ती, धर्मनिष्ठा आणि शौर्य यांच्या संस्कारांनी भरलेल्या वातावरणात गेले. लहानपणापासून त्यांना छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप यांसारख्या वीरपुरुषांच्या कथा ऐकण्याची आवड होती. या कथांमुळे त्यांच्या मनात शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाची भावना दृढ झाली. त्या काळातील ब्रिटिश सत्तेतील अन्याय आणि भारतीयांवरील अत्याचार पाहून त्यांच्या मनात देशभक्तीची जाणीव अधिक तीव्र झाली. त्यामुळे त्यांनी लहान वयातच देशसेवेचा मार्ग स्वीकारला. सावरकरांनी मित्रांसोबत देशभक्तीपर कविता, पोवाडे आणि भाषणे सादर करण्यास सुरुवात केली. याच बालपणीच्या प्रेरणेतून पुढे ते भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाचे क्रांतिकारक ठरले.

विनायक दामोदर सावरकर यांनी युवकांमध्ये देशभक्ती आणि स्वातंत्र्याची भावना निर्माण करण्यासाठी मित्रमेळा ही संस्था स्थापन केली. नंतर या संस्थेचे अभिनव भारत असे नामकरण करण्यात आले. ही एक गुप्त क्रांतिकारी संघटना होती, जिचा उद्देश ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र क्रांती उभारणे हा होता. या संघटनेद्वारे युवकांना देशभक्ती, शौर्य आणि बलिदानाची प्रेरणा दिली जात होती. गुप्त बैठका, क्रांतिकारी साहित्य आणि संघटनात्मक कार्याच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्याला दिशा देण्यात आली. अभिनव भारतमुळे अनेक तरुण क्रांतीच्या मार्गाकडे वळले आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवे बळ मिळाले.

विनायक दामोदर सावरकर उच्च शिक्षणासाठी लंडन येथे गेले आणि तेथे इंडिया हाऊसमध्ये राहून क्रांतिकार्य सुरू ठेवले. तेथे त्यांनी भारतीय विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती जागृत करून स्वातंत्र्यासाठी संघर्षाची प्रेरणा दिली. त्यांनी स्वदेशीचा प्रचार आणि विदेशी वस्तूंच्या बहिष्काराचा आग्रह धरला. युरोपातील क्रांतींचा अभ्यास करून त्यांनी भारतीय युवकांना संघटित केले आणि सशस्त्र क्रांतीची गरज मांडली. त्यांच्या प्रभावी कार्यामुळे अनेक युवक क्रांतीकडे वळले आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी दिशा मिळाली.

**१८५७ चे स्वातंत्र्यसमर ग्रंथ**

विनायक दामोदर सावरकर यांनी १८५७ चे स्वातंत्र्यसमर हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील एक अत्यंत प्रेरणादायी आणि क्रांतिकारी लेखन मानला जातो. त्या काळात इंग्रज इतिहासकार १८५७ च्या घटनांना शिपायांचे बंड असे संबोधत होते. मात्र सावरकरांनी आपल्या संशोधन आणि अभ्यासाच्या आधारावर हा उठाव केवळ बंड नसून भारताचा पहिला स्वातंत्र्यलढा असल्याचे ठामपणे सिद्ध केले.

या ग्रंथामध्ये त्यांनी १८५७ च्या संघर्षामागील राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्याची भावना आणि भारतीय जनतेचे बलिदान यांचे प्रभावी वर्णन केले. नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई आणि बहादूरशहा झफर यांसारख्या वीरांच्या कार्याचे गौरवपूर्ण चित्रण त्यांनी केले. त्यामुळे भारतीयांच्या मनात आपल्या इतिहासाबद्दल अभिमान निर्माण झाला.

सावरकरांनी या पुस्तकातून इतिहासाचा राष्ट्रवादी दृष्टीकोन मांडला. त्यांनी भारतीयांना हे पटवून दिले की स्वातंत्र्य मिळवण्यासाठी संघर्ष आणि बलिदान आवश्यक आहे. या ग्रंथामुळे युवकांमध्ये देशभक्तीची भावना अधिक तीव्र झाली आणि अनेक तरुण क्रांतीमार्गाकडे आकर्षित झाले.

सावरकरांवर देशद्रोहाचे आरोप ठेवून त्यांच्यावर खटला चालवण्यात आला. न्यायालयाने त्यांना दोन जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ही शिक्षा अत्यंत कठोर मानली जात होती. त्यानंतर त्यांना सेल्युलर जेल येथे पाठवण्यात आले. या शिक्षेला काळ्या पाण्याची शिक्षा असे म्हटले जात असे.

सावरकरांचे लेखन अत्यंत ओजस्वी आणि प्रभावी होते. त्यांच्या कवितांमधून राष्ट्रासाठी बलिदान देण्याची प्रेरणा मिळते. त्यांनी भारतीय इतिहासातील वीरपुरुषांचे कार्य गौरवपूर्ण पद्धतीने मांडले. त्यांच्या १८५७ चे स्वातंत्र्यसमर या ग्रंथाने भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना निर्माण केली.

**सावरकरांचे राष्ट्रप्रेम**

विनायक दामोदर सावरकर यांचे संपूर्ण जीवन राष्ट्रसेवेसाठी समर्पित होते. भारताला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य अर्पण केले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणे हेच त्यांचे जीवनध्येय होते. त्यांनी वैयक्तिक सुख, आराम आणि कौटुंबिक जीवनाचा त्याग करून राष्ट्रकार्यास प्राधान्य दिले.

सावरकरांच्या मनात मातृभूमीबद्दल अपार प्रेम आणि निष्ठा होती. भारत स्वतंत्र व्हावा यासाठी त्यांनी लहानपणापासूनच संघर्ष सुरू केला. युवकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना निर्माण करून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली. त्यांच्या ओजस्वी भाषणांमुळे आणि प्रेरणादायी विचारांमुळे अनेक तरुण क्रांतीमार्गाकडे वळले.

इंग्रज सरकारच्या कठोर शिक्षाही त्यांचे मनोधैर्य खचवू शकल्या नाहीत. काळ्या पाण्याची शिक्षा भोगताना त्यांनी अमानुष छळ सहन केला, परंतु राष्ट्रभक्तीची ज्योत कायम ठेवली. तुरुंगात असतानाही त्यांनी देशभक्तीपर कविता आणि लेखन करून इतर कैद्यांना प्रेरित केले.

सावरकरांचे राष्ट्रप्रेम केवळ स्वातंत्र्यलढ्यापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी समाजामध्ये एकता, स्वाभिमान आणि राष्ट्रीय भावना निर्माण करण्यासाठीही कार्य केले. त्यांना असे वाटत होते की मजबूत आणि एकसंघ समाजच राष्ट्राला प्रगतीच्या मार्गावर घेऊन जाऊ शकतो.

**भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान**

विनायक दामोदर सावरकर यांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी मानले जाते. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला आणि युवकांना अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या मते, स्वातंत्र्य हे प्रत्येक भारतीयाचे जन्मसिद्ध अधिकार आहे आणि ते मिळवण्यासाठी कोणतेही बलिदान देण्याची तयारी असली पाहिजे.

सावरकरांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला वैचारिक दिशा दिली. १८५७ चे स्वातंत्र्यसमर या ग्रंथातून त्यांनी भारतीयांना आपल्या इतिहासाची आणि स्वातंत्र्यलढ्याची जाणीव करून दिली. त्यांनी १८५७ चा संघर्ष हा भारताचा पहिला स्वातंत्र्यलढा असल्याचे सिद्ध करून भारतीयांच्या मनात अभिमान आणि आत्मविश्वास निर्माण केला.

सावरकरांचे योगदान केवळ राजकीय नव्हते, तर ते वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरावरही महत्त्वपूर्ण होते. त्यांच्या राष्ट्रभक्ती, धैर्य आणि संघर्षामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी ऊर्जा मिळाली. त्यामुळे भारतीय इतिहासात त्यांचे स्थान अत्यंत गौरवपूर्ण मानले जाते.

थोडक्यात,विनायक दामोदर सावरकर हे भारतीय क्रांतिकारी इतिहासातील एक तेजस्वी आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे धैर्य, त्याग, राष्ट्रभक्ती आणि साहित्यिक कार्य यांमुळे भारतीय स्वातंत्र्यलढा अधिक प्रभावी झाला. म्हणूनच सावरकरांचे कार्य भारतीय इतिहासातील सुवर्णपान म्हणून सदैव स्मरणात राहील.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९७६७८३०४९८

# महिला सक्षमीकरण : मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन



मासिक पाळी हा स्त्रीच्या जीवनाचा एक नैसर्गिक आणि अविभाज्य भाग आहे. ही एक जैविक (म्हणजेच बायलॉजिकल) प्रक्रिया आहे जी प्रजनन क्षमता आणि नवीन जीवनाची सुंदर क्षमता दर्शवते, मासिक पाळी ही स्त्रियांच्या आयुष्यातील नैसर्गिक प्रक्रिया असून यामुळे स्त्रीला मातृत्वाचा अनुभव घेता येतो. मात्र, मासिक पाळी विषयी बऱ्याच काळापासून अनेक गैर समजांविषयी आपण ऐकलेलं असेलच, आजच्या आधुनिक काळातही योग्य त्या ज्ञानाच्या किंवा माहितीच्या अंमलबजावणीची कमतरता भासून येते.

या संवेदनशील विषयाला समजून घेऊन मासिक पाळीबाबतचे समाजातील गैरसमज दूर करणे गरजेचे आहे, मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन हा सप्ताह अश्या अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी, महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी आणि मासिक पाळीच्या आरोग्याच्या चांगल्या पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत आहे.

सर्वप्रथम, २०१४ मध्ये वॉश युनायटेड ऑफ जर्मनी या एनजीओने मासिक पाळी स्वच्छता दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. हा दिवस दरवर्षी २८ मे रोजी साजरा केला जातो. वास्तविक, हा दिवस निवडण्यामागेही एक कारण आहे. साधारणपणे, बहुतेक महिलांची मासिक पाळी चक्र २८ दिवसांचे असते. त्यामुळेच हा दिवस साजरा करण्यासाठी २८ तारीख निवडण्यात आली.

२८ मे २०२३ ची मासिक पाळी स्वच्छता दिवसा-ची थीम आहे ' २०३० पर्यंत मासिक पाळी ही जीवनाची सामान्य वस्तुस्थिती बनवणे'आहे , मासिक पाळी मुळे कोणीही मागे हटणार नाही असे जग निर्माण करणे हे मुख्य ध्येय आहे..

theme of Menstrual Hygiene Day 28 may 2023 is "making menstruation a normal fact of life by 2030. goal is to build a world where no one is held back because they menstruate by 2030.'

**जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिनाचे महत्त्व**

'जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवस' साजरा करण्यामागचा उद्देश तरुण मुलींना आणि महिलांना मासिक पाळीच्या काळात स्वच्छतेची काळजी घेण्यासाठी आवश्यक माहिती देणे, जेणेकरून त्या अनावधानाने कोणत्याही प्राणघातक आजाराला बळी पडू नयेत. मासिक पाळी दरम्यान चांगल्या स्वच्छताविषयक पद्धती सुधारण्यासाठी आणि योग्य अश्या सवाई आमलात आणण्यासाठी, जीवघेण्या आजारापासून बचाव आणि जनजागृती करणे आशे या मागचे महत्त्व आहेत

खेड्यापाड्यात आणि शहरांमध्ये राहणाऱ्या लाखो स्त्रिया आजही यासंबंधीच्या महत्त्वाच्या माहितीपासून अनभिज्ञ आहेत आणि त्यांचा थोडासा निष्काळजीपणा त्यांना मासिक पाळीच्या काळातल्या अस्वच्छतेमुळे गंभीर आरोग्या चे धोके निर्माण होऊ शकतात, जसे की मूत्रमार्गात संक्रमण, भविष्यात वंध्यत्व आणि त्याशी संबंधित इतर आजार , मासिक पाळीची उत्पादने बदलल्यानंतर हात धुण्याकडे दुर्लक्ष केल्याने हिपॅटायटीस बी संक्रमण पसरू शकते. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग, योनीमार्गाचा संसर्ग यांसारख्या गंभीर आजार होण्याची शक्यताही वाढते हेही त्यांना माहीत नाही. त्याचा परिणाम महिलांवर केवळ शारीरिकच नाही तर मानसिकदृष्ट्याही दीर्घायुष्यावर होऊ शकतो. मासिक पाळीबद्दलची भीती, गैरसमज, मौन किंवा ह्या बद्दल काही बोलाव, प्रश्न विचारावे की नाही आशी दुविधा मनस्थिती बाजूला सारून या काळात चांगली स्वच्छता ठेवली गेली तर महिला आणि मुलींचं खूप मोठ्या प्रमाणावर सबलीकरण होईल याचा प्रचार करण्यासाठी, त्याची आठवण करण्यासाठी २८ मे हा दिवस साजरा केला जातो. त्यासाठी मासिक पाळीवर काम करणाऱ्या सगळ्या संस्था, सरकारं, खासगी कंपन्या, प्रसारमाध्यमे आणि व्यक्तींनी एकत्र येऊन काम करत आहेतच हा या मागचा हेतू आहे.जागतिक मासिक पाळी स्वच्छता (28 World Menstrual Hygiene Day) मासिक पाळीतील स्वच्छता आणि व्यवस्थापनाचे महत्त्व, महिलांना भेडसावणाऱ्या आव्हानांची चर्चा करू आणि तरुण मुली व महिलांच्या आरोग्यविषयक धोक्यांची जन जागृती करू आश्या सप्ताह साजरा करण्याचे महत्त्व अधोरेखित होईल अशी मी आशा करते

**मासिक पाळीच्या स्वच्छता आणि व्यवस्थापनाचे महत्त्व :** मासिक पाळीच्या स्वच्छता आणि व्यवस्थापनामध्ये महिलांचे शारीरिक आणि भावनिक कल्याण सुनिश्चित करण्यासाठी मासिक पाळीच्या दरम्यान वापरल्या जाणाऱ्या पद्धती आणि संसाधनांचा समावेश आहे. यामध्ये स्वच्छ आणि सुरक्षित सॅनिटरी उत्पादनांचा प्रवेश, मासिक पाळीच्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट, स्वच्छ पाणी आणि स्वच्छता सुविधा आणि मासिक पाळीच्या आरोग्याविषयी सर्वसमावेशक ज्ञान यांचा समावेश आहे. जेव्हा स्त्रियांना योग्य मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन उपलब्ध होते, तेव्हा त्या त्यांच्या मासिक पाळीत मर्यादित न राहता निरोगी आणि उत्पादक जीवन जगू शकतात.

**महिलांसमोरील आव्हाने :** दुर्दैवाने, मासिक पाळीच्या स्वच्छता आणि व्यवस्थापनाच्या बाबतीत जगभरातील अनेक महिलांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. या आव्हानांमध्ये परवडणाऱ्या आणि दर्जेदार सॅनिटरी उत्पादनांचा मर्यादित उपलब्धता, अपुरी पाणी आणि स्वच्छता सुविधा, सांस्कृतिक आणि सामाजिक निषिद्ध, मासिक पाळीबद्दल ज्ञान आणि जागरूकता नसणे आणि आरोग्यसेवा , मासिक पाळी च्या काळात शिक्षन मर्यादित होत विशेषतः तरुण मुलींन चा समावेश असू शकतो. अशा आव्हानांचा महिलांच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि एकूणच कल्याणावर गंभीर परिणाम होतो हे आपण बघतेच.

**मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन सप्ताह साजरे करण्याचे महत्त्व:** संवेदनशील विषयावर मोकळेपणाने संवाद साधण्याची संधी : मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन सप्ताह मौन तोडण्याची आणि मासिक पाळीशी संबंधित कलंक दूर करण्याची संधी प्रदान करते. मासिक पाळीवर खुलेपणाने चर्चा करून, आपण गैरसमजांना आळा घालू शकतो आणि या नैसर्गिक प्रक्रियेभोवतीचे संभाषण सामान्य करू शकतो.

**जागरूकता आणि शिक्षण:** हा आठवडा आपल्याला समुदाय, शाळा आणि व्यक्तींना मासिक पाळीच्या आरोग्य आणि स्वच्छतेबद्दल शिक्षित करण्यास विशेष निमित्त्या देतो. अचूक माहिती देऊन आणि मिथक दूर करून, आपण सर्वजण महिलांना माहितीपूर्ण निवडी करण्यास आणि त्यांच्या मासिक पाळीच्या आरोग्याची काळजी घेण्यास सक्षम करतो.

**संसाधनांमध्ये सुलभता :** मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन सप्ताह हे परवडणाऱ्या आणि टिकाऊ मासिक पाळीच्या उत्पादनांमध्ये सुधारित उपब्धते-नुसार समर्थन करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करू शकते. हे मासिक पाळीच्या आरोग्याला प्राधान्य देण्याची आणि प्रत्येक स्त्रीला सुरक्षित आणि स्वच्छ मासिक पाळीच्या उत्पादनांमध्ये योग्य मार्ग दर्शन करून देण्याची चांगली संधी आहे , याची खात्री करण्यासाठी सरकार, संस्था आणि समुदायांची गरज अधोरेखित करून देते.

**लांचे सक्षमीकरण:** हा आठवडा साजरा करून, आपण स्त्रियांच्या परिवर्तनशील, बहुआयामी आणि सामर्थ्याची कबुली देतो ज्या मासिक पाळीच्या काळात आव्हानांना तोंड देत असतानाही सतत भरभराट करत राहतात

**शाश्वत उपाय:** मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन सप्ताह देखील डिस्पोजेबल सॅनिटरी उत्पादनांसाठी पर्यावरणास अनुकूल पर्यायांना प्रोत्साहन देतो. हे मासिक पाळीचे कप आणि कापड पॅड यांसारख्या पुनर्वापर करण्यायोग्य आणि पर्यावरणास अनुकूल मासिक पाळीच्या उत्पादनांबद्दल जागरूकता वाढवते, जे केवळ कचरा कमी करत नाहीत तर महिलांसाठी दीर्घकालीन खर्चाची बचत देखील करतात.

मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन सप्ताह हे महिलांच्या हक्कांचे समर्थन करण्यासाठी, मासिक पाळीच्या संदर्भात शांतता तोडण्यासाठी आणि महिलांना त्यांच्या मासिक पाळीच्या आरोग्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम करण्यासाठी एक शक्तिशाली व्यासपीठ म्हणून काम करते. महिलांना भेडसावणाऱ्या आव्हानांना तोंड देऊन, जागरूकता वाढवून आणि संसाधनांपर्यंत सुधारित उपलब्धतेसाठी प्रोत्साहन देऊन, आपण असे जग निर्माण करू शकतो जिथे प्रत्येक स्त्री सन्मानाने, आत्मविश्वासाने आणि चांगल्या आरोग्यासह तिच्या मासिक पाळीचे व्यवस्थापन करू शकेल. चला हा आठवडा साजरा करूया आणि अशा भविष्यासाठी काम करूया जिथे मासिक पाळीची स्वच्छता ही आता अडथळा नसून महिला सशक्तीकरणाच्या दिशेने एक पाऊल टाकणार आहे.

या संवेदनशील विषयाला समजून घ्यावे मासिक पाळीबाबतचे समाजातील गैरसमज दूर होणे गरजेचे आहे,

**-डॉ. मनीषा जाधव**
होमिओपॅथिक फिजिशियन व
आहार तज्ज्ञ, नांदेड
मो. ९५१८५३९३९९

# सायकल बचाव, सायकल चलाव!

देशात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती इतक्या वाढल्या आहेत की, आता गाडीला इंधन भरताना चालक आधी पेट्रोल पंपावर जात नाही, तर थेट बँकेकडून कर्जाची चौकशी करतो. पण बँक सुद्धा त्याला कर्ज द्यायला तयार नाही. फुल टाकी हा शब्द आता सामान्य माणसासाठी स्वप्नातील राजवाड्यासारखा झाला आहे. शेतकऱ्यांची अवस्था तर आणखी बिकट. ट्रॅक्टर सुरू करण्यापूर्वी शेतकरी आता इंजिनला नारळ फोडतो आणि प्रार्थना करतात की, बाबा रे संपूर्ण शेत नांगरून होईपर्यंत तुझ्यामधलं डिझेल संपू देऊ नको. कारण डिझेलचा दर पाहून मशीन चालेल की मालकच बंद पडेल, याची खात्री उरलेली नाही.



एकेकाळी शेती ही देशाचा कणा मानली जायची. आता तो कणा डिझेलच्या दराने मोडण्याच्या अवस्थेत आला आहे. नांगरणी, पेरणी, पाण्याची मोटार, मालवाहतूक अशा प्रत्येक गोष्टीत इंधन लागते. पण शासकीय तज्ज्ञांच्या मते हा प्रश्न फारच सोपा आहे. पेट्रोल महाग झाले? मग गाडीच वापरू नका! शेतकऱ्यांनी ट्रॅक्टरऐवजी बैलगाडी वापरावी आणि शहरातील लोकांनी कारऐवजी सायकल चालवावी. बैलगाडीसाठी बैल भेटत नसल्यास गाढवं वापरा किंवा म्हशी वापरा, शेवटी प्राण्यांचा सुद्धा योग्य वापर झालाच पाहिजे ना!

एवढे साधे गणित जनतेला समजत नाही, हीच खरी राष्ट्रीय समस्या! हे गणित समजावून सांगण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती देखील स्थापन करण्यात येणार असल्याचे समजले. यामध्ये शिक्षकांचा समावेश असेल जे घरोघरी जाऊन लोकांना हे समजावून देतील. एरव्ही शिक्षकांना तरी काय काम आहे? शाळेतील विद्यार्थ्यांचे शिक्षण वगैरे अशा बाबीकडे लक्ष द्यायचं नसते, कारण त्या महत्त्वाच्या नाहीतच.

शहरी भागासाठी शासनाने आता एक विशेष योजना जाहीर केली आहे. राष्ट्रीय सायकल स्वावलंबन अभियान असं या अभियानाचे नाव आहे. यामध्ये प्रत्येक नागरिकाने सायकल घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यासाठी अनुदानही मिळणार. अर्थात, सायकलची किंमत पाच हजार आणि तिच्या अनुदानासाठी लागणारे फॉर्म, दाखले, ऑनलाईन अर्ज, सातबारा, आधार लिंकिंग, बँक पडताळणी आणि तीन सरकारी कार्यालयांच्या फेऱ्यांचा खर्च मिळून दहा हजार होणार, ही वेगळी गोष्ट. यासाठी बाबू लोकांना काही चिरीमिरी द्यावी लागली तर त्याने स्वतःच्या जबाबदारीवरती ते काम करावं.

शासनाचे म्हणणे अत्यंत दूरदर्शी आहे. प्रत्येकाने सायकल वापरली तर कोट्यवधी रुपयांचे पेट्रोल वाचेल. अगदी बरोबर! उद्या लोकांनी किमान एक वेळचं जेवण बंद केलं तर अन्नधान्याचीही प्रचंड बचत होईल. घरातील लाईट बंद ठेवल्या तर वीजबचत होईल आणि नागरिकांनी आजारी पडणे बंद केले तर आरोग्य खात्याचाही खर्च कमी होईल. अशी क्रांतिकारी अर्थनीतीची सुरुवात होते आहे.

शहरांमध्ये आता नवे दृश्य दिसू लागेल. मोठमोठे उद्योगपती, अधिकारी, मंत्री आणि नोकरदार मंडळी सगळे हेल्मेट घालून सायकलवरून कार्यालयात जातील. मंत्रालयाबाहेर लाल दिव्याच्या गाड्यांऐवजी स्टँडवर उभ्या असलेल्या सायकली दिसतील. व्हीआयपी सायकल मार्ग तयार होतील. एखाद्या मंत्र्याच्या सायकलला हिरवा झेंडा दाखवत पोलीस बंदोबस्त उभा राहील. जनतेला मात्र खड्डेमय रस्त्यावर सायकल चालवत जीव मुठीत धरावा लागेल.

ट्रान्सपोर्ट क्षेत्राची तर मोठी पंचाईत झाली आहे. डिझेल दरवाढीमुळे मालवाहतुकीचा खर्च वाढला, त्याचा परिणाम बाजारभावावर झाला. भाज्यांपासून सिमेंटपर्यंत सर्व वस्तू महागल्या. पण शासनाने त्यावरही उपाय शोधला आहे. जवळच्या बाजारातून वस्तू खरेदी करा, म्हणजे दूर जाण्यासाठी लागणारा पेट्रोल किंवा डिझेलचा खर्च वाचेल. आता लोकांनी सफरचंदाऐवजी करवंद खावे, कारण काश्मीरहून सफरचंद आणायला डिझेल लागते! ही शक्य नसल्यास आरोग्यासाठी अत्यंत पोषक असलेले चिंचोके खावेत!

सायकल चालवा असा संदेश सर्वांना मिळतो आहे. कोणालाही फोन केल्यास अगोदर एक ध्वनिफीत ऐकावी लागते. ती म्हणजे लोकांचे आरोग्य सुदृढ राहावे यासाठी सायकल बाळगा, सायकल वापरा. अमिताभ बच्चन यांच्या आवाजातील ही ध्वनिफीत आता सगळ्यांना तोंडपाठ झाली आहे.

या आर्थिक क्रांतीची नोंद जागतिक आरोग्य संघटना आणि संयुक्त राष्ट्र संघटनेने घेतली असल्याची माहिती आमच्या गुप्त सूत्राकडून समजली आहे.

सायकल चालवणे आरोग्यासाठी चांगलेच आहे. प्रदूषणही कमी होईल. पण प्रश्न सायकलचा नाही, तर परिस्थितीचा आहे. जनतेसमोर पर्याय उरला नाही म्हणून ती सायकलकडे वळते आहे, ही वस्तुस्थिती आहे. सरकारच्या धोरणांमुळे जर कार, ट्रॅक्टर आणि ट्रक परवडेनासे झाले, तर उद्या विमानप्रवास महाग झाल्यावर पतंग उडवा अभियान सुरू झाले तरी आश्चर्य वाटायला नको.

एका बाजूला डिजिटल इंडिया, सुपरफास्ट एक्सप्रेसवे, आधुनिक विकास यांची घोषणाबाजी सुरू आहे; तर दुसऱ्या बाजूला सामान्य माणसाला पुन्हा सायकलच्या युगात ढकलले जात आहे. विकासाच्या या रेसमध्ये पेट्रोलने एवढा वेग घेतला की जनता मात्र सायकलचे पायडल मारत मागे पडली, एवढे मात्र नक्की.

**-प्रा. सु. ग. जाधव**
नांदेड
मो. ९४ २३१ ४०७४१

# शेतकऱ्यांनी अफवांना बळी न पडता खत तुटवड्याच्या भीतीपोटी अनावश्यक खत खरेदी करू नये




**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांनी कृषी विद्यापीठाच्या शिफारसीत खतमात्रा, जमीन आरोग्य पत्रिका अहवाल तसेच पीक वाढीच्या टप्प्यानुसार खत खरेदी करावे. शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये व खत तुटवड्याच्या भीतीपोटी अनावश्यक खत खरेदी करू नये. खते उपलब्ध होण्यास अडथळा निर्माण झाल्यास, वाजवीपेक्षा जास्त दरात खत विक्री होत असल्यास, खतामध्ये कोणत्याही प्रकारची लिंकिंग होत असल्यास अथवा बोगस खतांची विक्री होत असल्यास तत्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांच्या दृष्टीने खत ही सर्वात महत्त्वाची निविष्ठा असते. राज्य पातळीवर खताचे नियोजन कृषी आयुक्तालय पुणे येथून होत असते. कृषी आयुक्तालयाकडून खरीप हंगामाच्या सुरवातीलाच जिल्ह्यासाठीचे खताचे आवंटन कळवले जाते. नांदेड जिल्ह्याला खरीप हंगामासाठी दरवर्षी सरासरी २ लाख मेट्रिक टन खतांची आवश्यकता असते. खरीप हंगाम २०२६ साठी नांदेड जिल्ह्याला सुमारे २ लाख ११ हजार ५०० मे.टन इतके खत आवंटन प्राप्त झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने ६० हजार २०० मे. टन युरिया, ३२ हजार ३०० मे. टन डीएपी व ८५ हजार ३०० मे. टन संयुक्त खते यांचा समावेश आहे.

मागील वर्षीची शिल्लक व यावर्षी १ एप्रिलपासून आजतागायत झालेला पुरवठा याचा अभ्यास केल्यास बाजारात ३१ हजार ०९८ मे. टन युरिया होता. पैकी १ एप्रिलपासून आज अखेर १४ हजार ५९७ मे. टन युरियाची विक्री झाली असून १६ हजार ५०२ मे. टन युरिया मार्केटमध्ये उपलब्ध आहे. १९ हजार २७५ मे. टन डीएपी पैकी ७ हजार ६०० मे. टन विक्री झाली असून, आज बाजारात ११ हजार ६७४ मे. टन डीएपी खत उपलब्ध आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे डीएपी सारखे खत आवश्यकतेपेक्षा थोडे कमी उपलब्ध असले तरीही २०:२०:०:१३, १२:३२:१६ यासारखे संयुक्त खतांचे पर्याय शेतकऱ्यांना वापरता येतील. सद्यस्थितीत ६७ हजार मे. टन संयुक्त खता सहित एकूण १ लाख २५ हजार ५०० मे. टन खते बाजारात उपलब्ध आहेत.

टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यास शेतकऱ्यांना सुलभ खत पुरवठा होण्याच्या दृष्टीने 'बफर स्टॉक' म्हणजेच संरक्षित खतसाठा निर्माण केलेला आहे. आज रोजी यामध्ये ४ हजार २८ मे. टन युरिया व १ हजार ४८५ मे. टन डीएपी खत उपलब्ध आहे, अशी माहिती कृषी विभागाने दिली आहे.

# 'विकसित महाराष्ट्र २०४७' साठी स्वारातीम विद्यापीठाचे उल्लेखनीय यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने येथे इतिहास रचला आहे. महाराष्ट्र शासनाने विद्यापीठाला 'विकसित महाराष्ट्र २०४७' अंतर्गत उच्च शिक्षण क्षेत्रासाठी भारतातील पहिली एआय-ब्लॉकचेन आधारित ऑनलाइन केपीआय मॉनिटरिंग सिस्टीम विकसित करण्याचा २९.९० लाखांचा प्रकल्प दिला आहे. ही प्रणाली राज्यातील सर्व ४२ सार्वजनिक विद्यापीठांच्या २८ मुख्य कार्यक्षमता निर्देशकांचा मागोवा एआय, रिअल-टाइम डॅशबोर्ड आणि ब्लॉकचेन-आधारित ऑडिट ट्रेलच्या माध्यमातून घेईल.



विद्यापीठाचे कुलगुरू तथा प्रकल्पाचे मानद समन्वयक डॉ. मनोहर जी. चासकर यांनी प्रकल्प टीमचे अभिनंदन करताना सांगितले की, हे यश विद्यापीठातील प्राध्यापकांच्या समर्पणाचे आणि तांत्रिक कौशल्याचे प्रतिबिंब आहे. यामुळे उच्च शिक्षण डिजिटल प्रशासनात स्वारातीम विद्यापीठ राष्ट्रीय पातळीवर आघाडीवर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच स्वारातीम विद्यापीठाच्या क्षमतेवर विश्वास ठेवून हा ऐतिहासिक प्रकल्प मंजूर केल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले.

प्रकल्पाचे मुख्य अन्वेषक व आयक्यूएसी संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी सांगितले की, ही नवीन केपीआय मॉनिटरिंग सिस्टीम सर्व ४२ विद्यापीठांमध्ये पारदर्शकता आणि अचूक डेटावर आधारित निर्णयक्षमता आणेल. त्यांनी अधोरेखित केले की त्यांच्या टीमचे इतर मोठे प्रकल्प पीएम-उषा डॅशबोर्ड (राज्य प्रकल्प संचालनालय, रुसा, महाराष्ट्र शासन) आणि ओयूआयएमएस (उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद) अंतिम टप्प्यात आहेत आणि लवकरच प्रक्षेपित होण्यास सज्ज आहेत. या सर्व यशांमुळे 'स्वारातीम' विद्यापीठाने उच्च शिक्षण डिजिटल प्रशासनात राष्ट्रीय नकाशावर आपले स्थान निर्माण केले आहे.

हे २८ केपीआय राष्ट्रीय मानकांशी सुसंगत बनवण्यात आले आहेत. सह-अन्वेषिका व शालेय गणित विज्ञान संचालक डॉ. रुपाली एस. जैन यांनी स्पष्ट केले की, या निकषांमध्ये एनआयआरएफ, नॅक आणि यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे विद्यापीठांना राष्ट्रीय रँकिंगशी सुसंगत राहून आपल्या प्रगतीचे योग्य मूल्यांकन करता येईल. सह-अन्वेषक व नवोन्मेष, उद्योग जोडणी व लिंकेजेस संचालक डॉ. एस. जे. वाधेर यांनी नमूद केले की, विविध विद्यापीठांच्या आयक्यूएसी संचालकांच्या सूचनांचा यात समावेश करण्यात आला असून, यामुळे संस्थांना आपल्यातील उणिवा शोधून एकूण कार्यक्षमता सुधारता येईल.

प्रणालीचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे. प्राथमिक आवृत्ती तीन महिन्यांत आणि एआय-आधारित अंतिम प्रणाली सहा महिन्यांत सादर केली जाईल. शासनाचा निधी केवळ सॉफ्टवेअर विकासासाठी आहे. सर्व हार्डवेअर व पायाभूत खर्च स्वारातीम विद्यापीठ स्वतः उचलेल.

प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा प्रमुख प्रा. एम. के. पाटील तसेच इतर सर्व विधी अधिकारी, संचालक आणि प्राध्यापकांनी प्रकल्प टीमचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे आणि पूर्ण प्रशासकीय मदतीचे आश्वासन दिले आहे. अनेक प्राध्यापकांनीही शुभेच्छा देत या प्रकल्पामुळे विद्यापीठाची प्रतिष्ठा वाढेल आणि राज्याच्या विकासात योगदान मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# सहा महिन्यांपासून वेतन रखडल्याने जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कर्मचाऱ्यांचे असहकार आंदोलन

## प्रलंबित मानधनाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांना निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामध्ये जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कार्यरत जिल्हा व तालुका स्तरावरील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे गेल्या सहा ते सात महिन्यांपासून मानधन प्रलंबित असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांनी असहकार आंदोलन सुरू केले आहे. या संदर्भात मंगळवार दि. २६ मे रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले.



केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या योजनांमध्ये जिल्हा व तालुका स्तरावर मागील १५ ते २० वर्षांपासून अनेक कर्मचारी कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहेत. मात्र, जलजीवन मिशन अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे डिसेंबर २०२५ पासूनचे मानधन प्रलंबित असून, मे २०२६ अखेर एकूण सहा महिन्यांचे वेतन थकले आहे. तसेच स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे फेब्रुवारी २०२६ पासूनचे मानधन रखडले असून, एकूण चार महिन्यांचे मानधन अद्याप मिळालेले नाही.

यापूर्वी महाराष्ट्र राज्या पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीच्या वतीने राज्यस्तरावर वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. मात्र, अद्याप कोणताही तोडगा निघालेला नाही. त्यामुळे २० मे पासून या कर्मचाऱ्यांनी असहकार आंदोलन सुरु केले आहे. प्रलंबित मानधनामुळे दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होत असून, मुलांच्या शिक्षणाचा खर्च, घरभाडे, आरोग्य खर्च तसेच बँकेचे हप्ते भरणे कठीण झाले असल्याची व्यथा कर्मचाऱ्यांनी मांडली. मागील सहा महिन्यांपासून उसनवारी करून संसार चालवावा लागत असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी कर्मचाऱ्यांच्या समस्येबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच येत्या २९ मे रोजी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या प्रधान सचिवांसोबत आयोजित बैठकीत या विषयावर चर्चा करण्यात येणार असल्याचे शिष्टमंडळाला त्यांनी सांगितले. दरम्यान, प्रलंबित मानधन तत्काळ अदा करावे तसेच आंदोलनादरम्यान कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा दबाव आणू नये, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर सुशिलकुमार मानवतकर, विशाल कदम, चौतन्य तांदुळवाडीकर, मिलिंद व्यवहारे, महेंद्र वाठोरे, बुध्दरत्न गोवंदे, सुनिल भोपालकर, माहिनी जाधव, नागेश स्वामी, प्रेमचंद कदम, दत्ता इंदूरकर, संतोष कांबळे, राजू जाधव, लक्ष्मीकांत टाकळकर, क्रांतीदीप थोरमोठे, हरिदास गायकवाड, बाळासाहेब शिंदे, नागेंद्र कांडलीकर, प्रदीप वाठोरे, गजानन पतंगे, व्ही.एच. चिगळे, साई उलीगडे, हनुमंत सूर्यवंशी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# गोवंश हत्या बंदी कायद्याची कठोर अंमलबजावणी करा; किनवटमधील सकल हिंदू समाजाची मागणी



**किनवट (प्रतिनिधी)–** शासनाच्या नवीन परिपत्रकानुसार किनवट तालुक्यात गोवंश हत्या बंदी कायद्याची अत्यंत कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी किनवट येथील विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांच्यासह सकल हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आली आहे. या संदर्भात स्थानिक पोलीस निरीक्षकांना बुधवार, दि. २७ रोजी लेखी निवेदन देण्यात आले.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या नवीन नियमावलीनुसार तालुक्यात कुठेही गोवंश हत्या होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी, गोवंश तस्करी करणाऱ्या गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध प्रचलित कायद्यानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, संशयास्पद वाहने आणि ठिकाणांवर पोलिसांची पाळत व गस्त वाढविण्यात यावी, तालुक्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि शासनाच्या आदेशांचे पालन करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचेही निवेदनात म्हटले आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना पाठीशी न घालता त्यांच्यावर तत्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणीही याप्रसंगी करण्यात आली.

यावेळी विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सकल हिंदू समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलिसांनी निवेदनाचा स्वीकार केला असून, कायदा व सुव्यवस्थेचे पालन करण्यासाठी योग्य ती पावले उचलली जातील, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

# आ. श्रीजया चव्हाण व उद्योजिका सुजया चव्हाण यांचा वाढदिवस विविध कार्यक्रमाने साजरा



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** भोकर विधानसभेच्या आमदार श्रीजया चव्हाण व उद्योजिका सुजया चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार, दि. २६ मे रोजी अर्धापूर तालुक्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आ. श्रीजया चव्हाण व उद्योजिका सुजया चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त मारोती मंदिरात महाआरती करून बजरंगबलीच्या आशीर्वादाने आ. श्रीजया चव्हाण व सुजया चव्हाण यांच्या हातून लोकसेवा घडत राहो, असे साकडे घालण्यात आले.

यावेळी संयोजक ईश्वर पाटील कपाटे, माजी चेअरमन व्यंकटराव कपाटे, बायो शुगरचे संचालक वसंतराव कपाटे, माजी सरपंच संभाजी मुंजाजी कपाटे, विक्रम कपाटे, प्रभू कपाटे, पांडुरंग कपाटे, अमोल कपाटे, संतोष कपाटे, ज्ञानेश्वर कपाटे, सुनील कपाटे, देविदास गंगातीरे, गजानन कपाटे, सतीश कपाटे, प्रवीण कपाटे, शिवानंद महाराज गोदरे, परमेश्वर कपाटे, देविदास कपाटे यांच्यासह गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# साई संस्थान व गोशाळा कौठा येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद भागवत कथेचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** श्री साई संस्थान व गोशाळा कौठा नांदेड येथे श्री साई बाबा यांच्या मूर्ती स्थापनेला ३६ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन २५ मे ते १ जून दरम्यान करण्यात आले आहे. २५ मे रोजी ह.भ.प. प्रवीण महाराज पार्डीकर यांच्या श्रीमद् भागवत कथेला दुपारी सुरुवात झाली व रात्रीला ह.भ.प. निखील महाराज चक्रवार यांच्या कीर्तन पार पडले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला असून, दैनंदिन काकडा आरती, साईबाबा अभिषेक, साई चरित्र पारायण, गाथा भजन, श्रीमद भागवत कथा रूपाली हरिपाठ व रात्री कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.



या सप्ताहात श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञमध्ये भागवत कथाकार हभप प्रवीण महाराज पार्डीकर यांच्या सुमधुर वाणीतून संगीतमय कथा दुपारी १ ते ४ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. तर सप्ताहमध्ये हभप निखिल महाराज आळंदीकर, हभप पंढरीनाथ महाराज मुरकुटे, हभप विश्वनाथ महाराज हिंबटकर, हभप महेश महाराज शेवाळकर, हभप बालाजी महाराज गुडेवार, हभप राम महाराज पांगेरकर, हभप राम महाराज ठाकूर बुवा पंढरपूरकर यांचे दैनंदिन कीर्तन व भजनी मंडळ संत भगवान बाबा अध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्था हरिपाठ व कीर्तन साथ सप्ताह मार्गदर्शक श्रीराम महाराज पांगेरकर हे आहेत. शुक्रवार दि. २९ मे रोजी श्रीकृष्ण प्राणप्रतिष्ठा दिवस वर्ष १० वे आहे. १ जून रोजी अखंड हरिनाम सप्ताह सांगता हभप राम महाराज ठाकूर पंढरपूर यांच्या काल्याचा कीर्तनाने व महाप्रसादाने होणार आहे. सप्ताह यशस्वीतेसाठी साई संस्थान व गोशाळा पदाधिकारी व विश्वस्त परिश्रम घेत आहेत.

पहिल्या दिवशी हभप प्रवीण महाराज व हभप निखिल महाराज यांच्या धार्मिक समिती प्रमुख गणेश श्रीरामराव गादेवार यांनी महाराजांना श्री पांडुरंगाची प्रतिमा देऊन सन्मानित केले. याप्रसंगी मंदिराचे कोषाध्यक्ष, टाळकरी व भक्तगण उपस्थित होते.

या अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद भागवत कथेचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, उपाध्यक्ष प्रल्हाद गव्हाणे, सचिव श्रीराज चक्रवार व पदाधिकारी यांनी केले आहे.

# मतपत्रिका छपाईवर निर्बंध

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक-२०२६ नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध घालण्यात आले आहे. याबाबत जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये दि. २२ मे २०२६ रोजी आदेश निर्गमीत केले आहेत.

या आदेशानुसार या निवडणुकीची नमुना मतपत्रिका छपाईस निवडणूक प्रक्रिया २५ जून २०२६ रोजी पूर्ण होईपर्यंत निर्बंध घातले आहेत. तसेच प्रत्येक इसमावर हे आदेश तामील करणे शक्य नसल्यामुळे हे एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकाद्वारे पोलीस विभागाने जाहीर करुन त्यास प्रसिद्धी करावी, असेही आदेशात स्पष्ट केले आहे.

# चिखलवाडीत पाणीपुरवठा पाईपलाईन गळतीमुळे नागरिक त्रस्त, दुरूस्तीची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** चिखलवाडी परिसरामध्ये सुरू असलेल्या नवीन रस्त्याच्या कामादरम्यान पिण्याच्या पाण्याच्या मुख्य पाईपलाईनला मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने परिसरातील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. लाटकर कॉम्प्लेक्सच्या पुढे (प्राणदा फिटनेस फिलोशीप जवळ) मुख्य पाईपलाईनला गळती लागल्याने मोठ्या प्रमाणात पिण्याचे पाणी वाया जात असल्याची माहिती नागरिकांनी दिली आहे.

या गळतीमुळे संपूर्ण चिखलवाडी भागात अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून आधीच दोन-तीन दिवसांनी होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांची गैरसोय वाढली आहे. अनेक नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून, भविष्यात रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर ही समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तसेच सदर पाईपलाईन फुटल्यामुळे रस्त्यावरील घाण पाण्यात मिसळून दुर्गंधीयुक्त पाणी येण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर चिखलवाडी परिसरातील नागरिकांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त यांना निवेदन देऊन संबंधित पाईपलाईनची तत्काळ दुरुस्ती करण्यात यावी, तसेच दुरुस्ती पूर्ण झाल्याशिवाय रस्त्याचे काम पुढे नेऊ नये, अशी मागणी केली आहे.

# मनपा झोन क्रं ७ अंतर्गत पांडुरंगनगर येथे आयुष्यमान आरोग्य शिबीर संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** मंगळवार, दि. २६ मे रोजी पंतप्रधान टीबी मुक्त भारत अभियानाद्वारे राष्ट्रीय क्षयरोग दुर्रीकरण कार्यक्रम मनपा अंतर्गत पांडुरंगनगर येथे आयुष्यमान १०० डे टीबी कॅम्पेनचा दुसरा टप्पा या कार्यक्रमातून आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले.

महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरीक्त आयुक्त निलेश सुंकेवार, आरोग्य उपायुक्त अजितपाल संधू, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिठे, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. मोहम्मद बदीयोद्दिन यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन केले होते.




या शिबिराचे उद्घाटन नगरसेवक प्रतिनिधी तथा माजी उपमहापौर उमेश पवळे यांच्या हस्ते करण्यात आले. खुशालसिंहनगर झोन क्रं. ७ दवाखाना येथील आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम भुरके, डॉ. बद्दीयोदीन, डॉ. ऐश्वर्या मुंगीलवार, डॉ. जयश्री आढाव, डॉ. रिद्धी कंठेवाड, चंद्रभान धोंडगे, कैलाश तेलंग, पांडुरंग दुमाणे, किशोर राठोड, कल्पना गायकवाड, जना शिंदे, सुरेखा खंडागळे, प्रतिभा वाघमारे, जोत्सना गायकवाड, विकी वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थित हा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमास पांडुरंगनगर, बसवंतानगर, महेबुबनगर, लक्ष्मीनगर, गोविंदनगर, विठ्ठलनगर व झोन क्रं. ७ अंतर्गत भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित १५० नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यातील ९० जणांचे तेथेच एक्स-रे काढण्यात आले. ९८ जणांची बीपी चेक करण्यात आली. १२२ शुगर तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमास क्षयरोग विभाग व खुशालसिंहनगर व पांडुरंगनगर दवाखान्यातील आरोग्य विभागाचे सर्व कर्मचारी, आरोग्य सेविका व सर्व आशा वर्कर यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्राला नांदेड बीडीओचा कोलदांडा; तक्रारकर्त्यास न्याय कोण देणार?

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरापासून जवळच असलेल्या धनेगाव/मुजामपेठ अंतर्गत जय हनुमान सोसायटी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था अंतर्गत बोगस चेअरमन म्हणून कन्व्हेन्स डीड करून प्लॉटधारकाची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधक, तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांना जिल्हाधिकारी यांनी दिले होते. परंतु यातील गटविकास अधिकाऱ्यांनी त्यांच्या पत्राला केराची टोपली दाखवली आहे. अद्याप त्यांचा अहवाल प्राप्त झाला नसल्याने प्लॉटधारक भयभीत झाला आहे.

नांदेड शहराला लागून असलेल्या धनेगाव/मुजामपेठ अंतर्गत सर्वे नंबर १२१ मधील प्लॉट नंबर ३६८ ची १३ फेब्रुवारी २०२६ रोजी दस्त क्रमांक १७ ४१/ २०२६ दुय्यम निबंधक नांदेड (एक) येथे कन्व्हेअन्स डीड करण्यात आली. ही संस्था यापूर्वीच रद्द झाली आहे. मात्र तोतया व बोगस चेअरमन बनून कन्व्हेस डीड करून देणाऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावे, या प्रकरणाची सखोल चौकशी करून तसा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास कळवावा, असे पत्र ५ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी दिले होते. यातील जिल्हा उपनिबंधक आणि तहसीलदार यांनी आपला अहवाल तत्काळ प्रभावाने सादर केला, परंतु गटविकास अधिकारी, नांदेड यांनी अद्याप अहवाल सादर न केल्याने हे प्रकरण लालफितीत अडकले आहे. त्यामुळे आदिवासीबहुल भागातील किनवट तालुक्यातील कुपटी (बु.) येथील तक्रारकर्ता माधव उमाजी झुरेकर हे मात्र भयभीत झाले आहेत. या बाबीकडे पुन्हा एकदा जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# टोमॅटो-दुधाचा नॅचरल फेस पॅक



**ऑफिसचे काम, घरातील काम इत्यादी गोष्टींमुळे कित्येकांचा संपूर्ण दिवस व्यापलेला असतो. अनेक कामांमुळे आलेला शारीरिक थकवा आपल्या चेहऱ्यावरही स्पष्ट दिसतो. यामुळे आपला चेहरा निस्तेज आणि निर्जीव दिसू लागतो. झोप पूर्ण न झाल्यास दुसऱ्या दिवशीही चेहरा सुजलेला वाटतो. सकाळी उठल्यानंतर चेहरा प्रसन्न आणि टवटवीत दिसावा, असे तुम्हाला वाटते का ? तर यासाठी एक साधा आणि सोपा नैसर्गिक उपाय करून पाहा. आम्ही सांगत असलेला फेस पॅक तयार करण्यासाठी तुम्हाला केवळ दोन गोष्टींची आवश्यकता आहे. ज्या तुमच्या स्वयंपाकघरामध्ये सहजरित्या उपलब्ध असतात. सुंदर आणि नितळ त्वचा मिळवण्यासाठी टोमॅटोचे एक स्लाइस आणि चार ते पाच चमचे दूध या दोनच गोष्टी आवश्यक आहेत.**

## सुंदर, नितळ त्वचेसाठी टोमॅटोचे एक स्लाइस, चार-पाच चमचे दूध

- असा तयार करा फेस पॅक : एका वाटीमध्ये चार ते पाच चमचे दूध घ्या. आता एक टोमॅटो स्वच्छ धुऊन घ्या आणि त्याचे एक स्लाइस कापा. टोमॅटोची साल काढावी. दुधामध्ये टोमॅटो मिक्स करा आणि चमच्याच्या मदतीने मॅश करा. आता हे मिश्रण कापसाच्या मदतीने आपल्या चेहऱ्यावर लावा. दोन ते तीन मिनिटांपर्यंत हे मिश्रण सुकू द्यावे. यानंतर त्यावरच पुन्हा एकदा मिश्रण लावावे. वाटीतील संपूर्ण मिश्रण संपेपर्यंत ही क्रिया करत राहावी.
- या गोष्टींकडे दुर्लक्ष करू नका : या फेस पॅकचा उपयोग करताना दोन गोष्टींची काळजी घ्यावी. पहिले म्हणजे फेस पॅक लावण्यापूर्वी चेहरा स्वच्छ धुऊन घ्यावा. दुसरे म्हणजे हे पॅक चेहऱ्यावर रात्रभर लावून ठेवावा. फेस पॅक सुकल्यानंतर झोपताना कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत. फेस पॅक लावून तुम्ही आरामात झोपू शकता.
- सकाळी उठल्यानंतर थंड पाण्याने चेहरा धुऊन घ्या : सकाळी उठल्यानंतर थंड पाण्याने आपला चेहरा स्वच्छ धुऊन घ्यावा. कॉटनच्या टॉवेलनं चेहरा स्वच्छ पुसून घ्या. यानंतर सर्वप्रथम चेहऱ्यावर गुलाब पाणी लावा आणि थोड्या वेळानं मॉइश्चराइझर देखील लावा. हवे असल्यास आपण आपली आवडती क्रीमदेखील लावू शकता. पण याआधी गुलाब पाणी लावणे आवश्यक आहे. आठवड्यातून केवळ दोनदा या फेस पॅकचा उपयोग केल्यासही तुम्हाला तुमच्या त्वचेमध्ये सकारात्मक बदल अनुभवायला मिळतील. कारण या फेस पॅकमुळे त्वचा हायड्रेट राहते आणि त्वचेला पोषण तत्त्वांचा पुरवठा देखील होतो. चेहऱ्यावर डाग, मुरुम इत्यादी समस्या देखील दूर होण्यास मदत मिळते.



- त्वचेसाठी प्रभावी उपाय : टोमॅटो आणि दुधातील पोषण तत्त्वांमुळे आपल्या त्वचेला भरपूर लाभ मिळतात. टोमॅटोमध्ये नैसर्गिक स्वरुपात ब्लीचिंग प्रॉपर्टीज् आहेत. यामुळे त्वचा उजळण्यास मदत मिळते. दुधामुळे आपल्या त्वचेला ओलावा मिळते, ज्यामुळे त्वचा हायड्रेट राहते. कारण दुधामधील लॅक्टिक ॲसिड आणि प्रोटीन त्वचेच्या पेशी दुरुस्त करण्याचे कार्य करतात.
- त्वचेचं पीएच लेव्हल राहते संतुलित : त्वचेसाठी पोषक असणारे व्हिटॅमिन सी देखील टोमॅटोमध्ये आहे. याव्यतिरिक्त एस्ट्रिंजेंट आणि अँटी-ऑक्सिडेंट गुणधर्म देखील टोमॅटोमध्ये असतात. टोमॅटो दुधामध्ये मिक्स करून लावल्यास त्वचेला मोठ्या प्रमाणात पोषण तत्त्वांचा पुरवठा होतो. यामुळे त्वचेचं पीएच लेव्हल देखील संतुलित राहते. यामुळेच दूध आणि टोमॅटोपासून तयार करण्यात आलेले पॅक त्वचेसाठी प्रभावी उपाय आहे. दरम्यान स्वयंपाकामध्ये दूध आणि टोमॅटोचा कधीही एकत्रित उपयोग करू नये. दूध आणि टोमॅटोचे एकत्र सेवन केल्यास पोटाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

# मान्सून तोंडावर... पावसाळी शॉपिंगचं करूया नियोजन...

**मान्सून तोंडावर आला आहे. तुम्हाला पावसाळ्यासाठी अद्याप काहीही खरेदी करता आले नसेल किंवा काय खरेदी करावे याबद्दल संभ्रमात असाल तर येथे आम्ही तुम्हाला अशाच काही वस्तू सांगत आहोत. उन्हाळ्यानंतर पावसाळ्यानुसार आपण आपल्या वॉर्डरोबमध्ये काही आवश्यक बदल केले पाहिजेत. हा देखील सेलचा हंगाम आहे, त्यामुळे शॉपिंगला जात असाल तर या गोष्टी लक्षात ठेवा...**



- बॅग कशी असावी : पावसाळ्यात एखादी नवी बॅग खरेदी करण्याचा विचार करत असाल तर वॉटरप्रूफ बॅगेची निवड करावी. यामुळे पावसाळ्यात बॅग भिजली तरी त्यातील पैसे, महत्त्वाचे डॉक्युमेंट्स ओले होणार नाही. पावसाळ्यातील फॅशन आणि सुरक्षा असेल अशाच बॅगची निवड करा. या सीझनमध्ये तुम्ही तुमच्या आवडीनुसार जॅकेट किंवा रेनकोट निवडू शकता. विंड शीटऐवजी ते पावसाळ्यात ही कमाल करतील आणि तुम्हाला स्टायलिश लूकही देतील.
- वॉटरप्रूफ मेकअप : पाऊस पडला तर मेकअप वाहून जाईल. म्हणून वॉटरप्रूफ मेकअप करा. जर तुमच्याकडे वॉटरप्रूफ मेकअप किट नसेल तर ते ताबडतोब बाजारातून खरेदी करा. जेणेकरून तुम्ही पावसाळ्यातही स्वतःला सेक्सी आणि ग्लॅमरस लूक देऊ शकाल.
- छत्री-टोपी घ्यावीच लागते : पावसापासून शरीराचे संरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. पावसात भिजणे काही वेळापुरते रोमॅन्टीक वाटत असले तरी ते आजारीही पाडू शकते. यासाठी तुम्ही छत्रीव्यतिरिक्त टोपीचाही वापर करू शकता. हल्ली अनेक प्रकारच्या टोप्या ट्रेंडमध्ये आहेत. आपल्या आवडीची टोपी घ्या आणि ती घाला. केस सुरक्षित राहतील आणि तुम्हाला स्टायलिश लुकही मिळेल.
- पावसाळी चपलांची निवड : पावसाळ्यात पूर्णपणे वॉटरप्रुफ असलेलीच पादत्राणे वापरा. काही लोकांना चामड्याच्या मोजडी, पायताण वापरण्याची हौस असते. पण पावसाळ्यात अशा चपला घालू नका. पावसात भिजल्याने चामड्याच्या चपलावर बुरशी येते. त्यामुळे त्या चपला खराब होतात. पावसाळ्यात फॅशनेबल आणि स्टायलिश पादत्राणे घेण्याऐवजी पाणी आणि घाणीतही घालू शकतील अशी पादत्राणे घ्या आणि ती खराब होणार नाहीत. ते आपल्या पायांचे रक्षण देखील करतात.
- त्वचेची काळजी : पावसाळ्यात त्वचा सतत ओली राहील्याने बोथट होते. तेव्हा त्यावर योग्य त्या क्रिम्सचा वापर करा. ज्यामुळे स्कीन बोथट होणार नाही. तसेच पावसात जाण्याआधी त्वचेला मॉईश्चरायझर लावा. त्यामुळे पावसाळ्यात त्वचा कोमल राहण्यास मदत होईल.



# कॉटन पॅन्ट निवडताना...

**तुम्हाला या पावसाळ्यामध्ये जीन्सला पर्याय हवा असेल तर तुम्ही कॉटन पॅन्टचा पर्याय निवडू शकता. कॉटन पॅन्ट घातल्याने पावसाळ्यात होणारे स्किन इन्फेक्शन मोठ्या प्रमाणात आपण आटोक्यात आणू शकतो. त्यामुळे पावसाळ्यात तर ही कॉटन पॅन्ट तुम्हाला नव्या लूक सोबतच कम्फर्ट देखील देईल.**



करीना कपूर आणि बॉलीवूडच्या अनेक अभिनेत्री पावसाळ्यात कॉटन जीन्समध्ये दिसतात. सध्या उन्हाळा सुरू आहे. या ऋतूतही या कॉटन पॅन्ट खूपच आरामदायी वाटतात. उन्हाळ्यात तसेच पावसाळ्यात खूप गरम होत असते. त्यामुळे या काळत जीन्सला हा सर्वात उत्तम पर्याय असू शकतो. पावसाळ्याच्या दिवसात जीन्स घातल्याने पायांना खाज येणे, पायांना चट्टे येणे यांसारख्या गोष्टी होतात. पण कॉटन पॅन्टमुळे या गोष्टी कमी प्रमाणात होतात. तुम्ही कॉटन पॅन्ट वापरून ऑफिसलाही जाऊ शकता. यामुळे जर तुम्ही पावसाने भिजलात तरी तुम्हाला त्याचा जास्त त्रास होणार नाही.

- कॉटन पॅन्ट बरी : पावसाळ्यात त्वचेचे आजार मोठ्या प्रमाणात होताना दिसतात. त्यामुळे या काळात तुम्ही कॉटन पॅन्ट वापरण्याकडे भर द्या. त्याच प्रमाणे ब्रेझरचा सुद्धा तुम्ही विचार करू शकता. त्यावर ही कॉटनची पॅन्ट तुम्ही परिधान करू शकता.
- पॅन्ट विकत घेताना हा विचार नक्की करा : कॉटन पॅन्ट जीन्सप्रमाणे खूप टाईट नसतात. त्यामुळे त्या थोड्या सैल घेण्याकडे भर द्या. त्यामुळे तुम्हाला आरामदायी वाटेल आणि तुमचा लूक ही खूलून दिसेल. बाजारात सध्या ७०० रुपयांपासून अनेक उत्तम कॉटन पॅन्ट उपलब्ध आहेत. यापेक्षा ही कमी किंमतीत तुम्हाला ही पॅन्ट मिळू शकते.
- पॅन्टचा रंग : पावसाळ्यात पावसाचा आनंद घेण्यासाठी आपण ट्रिप प्लॅन करतो. यावेळी आजूबाजूला हिरवा रंग जास्त असल्याने गुलाबी, आकाशी, पिस्ता, पिवळा अशा रंगाच्या पेस्टल शेड्स सगळ्यात सुंदर दिसतात. सध्या हा रंग ट्रेडमध्ये आहेत. त्याप्रमाणे डेनिम ब्लू, काळा किंवा राखाडी हे जीन्समधले रंग देखील छान दिसतील. या पॅन्टवर तुम्ही कोणतेही टी- शर्ट घालू शकता.

# चेहऱ्यावर कच्चे दूध कसे लावायचे?

**प्रत्येक व्यक्तीला आपली त्वचा नेहमी चमकदार आणि डागरहित असावी असे वाटते. पण आजकाल वाढते प्रदूषण, चुकीच्या खाण्याच्या सवयी आणि चुकीच्या जीवनशैलीमुळे लोकांना त्वचेशी संबंधित अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे मुरुम, ब्लॅकहेड्स, सुरकुत्या, पिगमेंटेशन यासारख्या त्वचेच्या समस्या उद्भवू लागतात. या समस्यांपासून मुक्त होण्यासाठी लोक विविध प्रकारचे सौंदर्य आणि त्वचेची काळजी घेणारी उत्पादने वापरतात. त्याच वेळी, बाजारात उपलब्ध असलेली बहुतेक उत्पादने हानिकारक रसायनांनी भरलेली असतात, ज्यामुळे आपल्या त्वचेला हानी पोहोचते. अशा स्थितीत तुम्हाला हवे असल्यास नैसर्गिकरीत्या चमकणारी त्वचा मिळवण्यासाठी तुम्ही कच्चे दूध वापरू शकता. वास्तविक, दुधामध्ये प्रथिने, जीवनसत्त्वे, कॅल्शियम, लोह आणि अँटीऑक्सिडंट्ससारखे पोषक घटक असतात, जे त्वचेसाठी आवश्यक असतात. दुधामध्ये लॅक्टिक ॲसिड असते, जे त्वचा स्वच्छ करण्यात मदत करते. चेहऱ्यावर नियमित दूध लावल्याने त्वचा मुलायम आणि चमकदार होते. याव्यतिरिक्त, त्वचेचा टोन सुधारू शकतो. तुम्हाला हवे असल्यास दुधात काही गोष्टी मिक्स करून लावू शकता. चला तर मग जाणून घेऊया चेहऱ्यावर कच्चे दूध कसे लावायचे ?**

- कच्च्या दुधाचे फायदे : कच्चे दूध त्वचेचा टोन सुधारण्यास आणि संध्याकाळपर्यंत मदत करू शकते. लॅक्टिक ॲसिड कच्च्या दुधात आढळते, जे सौम्य एक्सफोलिएंट म्हणून कार्य करते आणि मृत त्वचेच्या पेशी काढून टाकण्यास मदत करते. यामुळे तुमची त्वचा चमकदार, स्वच्छ आणि चमकदार दिसू लागते. कच्च्या दुधामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात, ज्यामुळे मुरुम, सनबर्न आणि त्वचेची जळजळ यासारख्या त्वचेच्या विविध समस्यांपासून आराम मिळतो. याशिवाय कच्च्या दुधाच्या वापरामुळे त्वचेवरील लालसरपणा कमी होतो, त्यामुळे संवेदनशील त्वचा असलेल्या लोकांसाठीही त्याचा वापर सुरक्षित असू शकतो.
- दूध आणि मध : तुम्हाला हवे असल्यास तुम्ही दुधात मध मिसळून चेहऱ्याला लावू शकता. मधामध्ये मॉइश्चरायझिंग गुणधर्म असतात, जे त्वचेला हायड्रेट ठेवण्यास मदत करतात. याशिवाय मुरुम, डाग आणि सुरकुत्या कमी करण्यासाठी देखील हे उपयुक्त आहे. यासाठी एका भांड्यात २ चमचे दूध घ्या. त्यात १ चमचा मध घालून चांगले मिसळा. नंतर ते चेहऱ्यावर लावा आणि सुमारे १५ मिनिटांनी धुवा. आपण आठवड्यातून २-३ वेळा वापरू शकता.
- दूध आणि कॉफी पावडर : कॉफी पावडर दुधात मिसळून चेहऱ्याला लावता येते.



कॉफी त्वचेवरील डाग आणि पिगमेंटेशन दूर करण्यास मदत करते. याशिवाय, ते त्वचेचा टोन सुधारण्यासाठी देखील प्रभावी आहे. यासाठी एका भांड्यात दोन चमचे दूध घ्या. त्यात एक चमचा कॉफी पावडर टाका आणि मिक्स करा. आता ते चेहऱ्यावर लावा आणि सुमारे १५ मिनिटे राहू द्या. त्यानंतर चेहरा पाण्याने धुवा. आठवड्यातून २ ते ३ वेळा याचा वापर



केल्याने तुमची त्वचा नैसर्गिकरित्या चमकदार दिसेल.

- दूध आणि हळद : दुधात हळद मिसळून चेहऱ्यावर लावू शकता. यासाठी एका भांड्यात २-३ चमचे दूध घ्या. त्यात चिमूटभर हळद घालून मिक्स करा. नंतर ते चेहऱ्यावर लावा आणि सुमारे १५ मिनिटे राहू द्या. त्यानंतर चेहरा पाण्याने धुवा. यामुळे तुमच्या चेहऱ्यावरील मुरुम आणि डाग कमी होतील. याशिवाय त्वचाही सुधारेल. हळदीचा वापरामुळे त्वचा उजळ्यास मदत होईल.
- वृद्धत्व विरोधी : कच्च्या दुधात व्हिटॅमिन ए, डी आणि ई सारख्या अँटिऑक्सिडंट्ससह बीटा-केसिन प्रोटीनचे प्रमाण चांगले असते. हे मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून त्वचेचे संरक्षण करून वृद्धत्वाची लक्षणे कमी करण्यात मदत करतात. याशिवाय, हे अँटिऑक्सिडंट गुणधर्म ऑक्सिडेटिव्ह तणावाचा सामना करण्यासाठी, कोलेजन उत्पादनास प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्वचेवरील बारीक रेषा आणि सुरकुत्या कमी करण्यासाठी देखील प्रभावी आहेत.

# पावसाळ्यात कोणते कपडे निवडाल?

**जसं प्रत्येक ऋतूनुसार आरोग्याची काळजी घेणं आवश्यक असतं. त्याचप्रमाणे आपल्या आउटफिट्सबाबतही काही गोष्टी लक्षात घेणं आवश्यक असतं. प्रत्येक सीझननुसार आपल्यासाठी काही फॅब्रिक्स बेस्ट असतात. तर काही फॅब्रिक्स काही ऋतूंमध्ये समस्यांचं कारण ठरतात. मान्सूनमध्ये असेच काही फॅब्रिक्स खरेदी करणं किंवा वेअर करणं समस्यांचं कारण ठरू शकतं. आज आम्ही तुम्हाला अशाच काही फॅब्रिक्सबाबत सांगणार आहोत, जे शक्यतो पावसाळ्यामध्ये वेअर करणं टाळणचं फायदेशीर ठरतं.**

- व्हेलवेट : व्हेलवेट डिफ्रंट लूक कॅरी करण्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतं. पण पावसाळ्यामध्ये हे कपडे वेअर करणं शक्यतो टाळणंचं फायदेशीर ठरतं. घामामुळे किंवा पावसाळ्यात भिजल्यानंतर व्हलवेट फार जड होतं. तसेच ते लवकर सुकतही नाही. कारण हे कापड लिक्विड फार लवकर शोषून घेतं.
- लेदर : पाणी म्हणजे लेदरचा दुश्मनचं... असे कपडे ज्यांमध्ये लेदर असेल किंवा शूज पावसाळ्यामध्ये



वेअर करणं कटाक्षाने टाळावं. कारण जर असे कपडे किंवा शूज तुम्ही वेअर केले तर यांवर पाणी पडेल आणि ते खराब होतील.
- डेनिम : डेनिम जीन्स किंवा जॅकेट तसं पहायला गेलं तर फार कन्फर्टेबल असतात. परंतु मान्सूनमध्ये हे खरेदी करू नये. पाण्याने भिजल्यानंतर हे फॅब्रिक्स फार जड होतात. एवढंच नाही तर लवकर सुकतही नाहीत. ज्यामुळे चालणंही अवघड होतं. याऐवजी तुम्ही कॉटन पॅन्ट्स किंवा शॉर्ट्स खरेदी करू शकता.
- सिल्क : तुम्हाला पावसाळ्यामध्ये एखाद्या लग्नसोहळ्याला हजेरी लावायची आहे का ? त्यासाठी तुम्ही जर सिल्कची साडी, शर्ट किंवा पॅन्ट वेअर करण्याच्या विचारात असाल तर तुमचा विचार त्वरित बदला. कारण सिल्कच्या साड्यांवर पाण्याचे डाग तसेच राहतात आणि हे डाग काही केल्या जातचं नाहीत.

# अकोल्याच्या सार्थकनं ५७ देशांमध्ये उंचावली भारताची मान, ७ वर्षांनंतर ऑलिम्पियाडमध्ये भारताची पदकाला गवसणी!



**अकोला (प्रतिनिधी)**–पोलंडमधील वॉर्सा येथे आयोजित ३४ व्या आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान ऑलिंपियाड २०२६ मध्ये अकोल्यातील १७ वर्षीय सार्थक ढोले याने कांस्यपदक पटकावले. या स्पर्धेत ५७ देशांतील १२४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धकांना दिलेल्या विषयांपैकी एका विषयावर तात्त्विक निबंध लिहून विचार मंडावे लागले. २०१९ नंतर प्रथमच भारताला या स्पर्धेत पदक प्राप्त झाले.

आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान ऑलिंपियाड २०२६ चे आयोजन पोलिश तत्त्वज्ञान संस्था यांनी वॉर्सा विद्यापीठाच्या सहकार्याने केले होते. भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व बंगळुरू येथील शिक्षण तज्ज्ञ डॉ. मीरा बैंदूर यांनी केले, तर मिटी विद्यापीठ, जयपूर येथील तत्त्वज्ञान व मानवविद्या प्राध्यापक डॉ. मनी सचदेव सह-प्रतिनिधी म्हणून सहभागी होते. भारतीय प्रतिनिधी मंडळातील शिक्षकांनी आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळातही भूमिका बजावत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, प्रशिक्षण व राष्ट्रीय निवड प्रक्रियेत सहकार्य केले. वॉर्सा येथे सार्थक ढोले याच्या निबंधात प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ अरिस्टॉटल यांच्या विचारांवर आधारित निवड, इच्छा, तर्क आणि नैतिक जबाबदारी यांसारख्या विषयांचे विश्लेषण केले. 'स्वातंत्र्य आणि तर्क' हा मुख्य विषय होता. तो प्राणी वर्तनशास्त्र, विज्ञानाचे तत्त्वज्ञान, हर्मेन्युटिक्स, सेमिऑटिक्स, भाषेचे तत्त्वज्ञान, मेटाएथिक्स आणि ज्ञानमीमांसा यांसारख्या विषयांवर लेखन करतो. त्यांच्या अभ्यासात तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांचा समन्वय दिसून येतो.

आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान ऑलिंपियाड ही माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी जगातील अत्यंत प्रतिष्ठेची स्पर्धा मानली जाते. यात विद्यार्थ्यांच्या तार्किक विचारशक्ती, चिकित्सक विचार, युक्तिवाद मांडण्याची क्षमता आणि तात्त्विक लेखनकौशल्य यांची कसोटी लागते. भारत २००७ पासून या स्पर्धेत सहभागी होत असून विद्यार्थ्यांची निवड कठोर राष्ट्रीय प्रक्रियेद्वारे केली जाते.

सार्थक यांनी भारतीय निवड प्रक्रियेत तीन वेळा राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवला. तत्त्वज्ञानाव्यतिरिक्त त्याने इतर आंतरराष्ट्रीय शैक्षणिक स्पर्धांमध्येही भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय शैक्षणिक यशामुळे सार्थक हा जयश्री पेरीवाल आंतरराष्ट्रीय विद्यालय, जयपूर येथे आंतरराष्ट्रीय बॅकलॉरिएट डिप्लोमा कार्यक्रमाच्या इयत्ता अकरावी व बारावीसाठी पूर्ण शिष्यवृत्तीवर शिक्षण घेत आहे. अकोल्यातून जयपूर, हेलसिंकी, बारी, बुडापेस्ट आणि आता वॉर्सापर्यंतचा सार्थक याचा प्रवास इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# केरळमध्ये ईडी विरुद्ध कार्यकर्त्यांचा संताप; अधिकाऱ्यांच्या कारवर हल्ला



**तिरुअनंतपुरम (वृत्तसंस्था)** – ईडीच्या अधिकाऱ्यांनी विजयन यांच्या घराजवळ येताच विजयन यांच्या समर्थकांनी ईडीच्या अधिकाऱ्यांची कार अडवली, त्यावर जोरदार हल्लाबोल केला. संतप्त झालेल्या समर्थकांनी ईडी आणि मोदींविरुद्ध घोषणाबाजी केली, विशेष म्हणजे यावेळी अधिकाऱ्यांच्या कारवर चक्क विटा फेकून मारण्यात आल्याचंही पाहायला मिळालं.

देशभरात ईडी कारवाईनंतर अनेकांच्या भ्रष्टाचाराची आणि अवैध संपत्तीची प्रकरणे समोर आली आहेत. मात्र, काही ठिकाणी ईडीकडून जाणीवपूर्वक कारवाई केली जात असल्याचा आरोपही होत आहे.

केंद्र सरकारच्या आदेशानंतर ईडीचे अधिकारी आपली गाडी सुरू करतात आणि फक्त विरोधी पक्षातील नेत्यांवर रेड टाकतात असाही आरोप काही राजकीय नेत्यांकडून, कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.

आता, ईडीने केरळचे माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या घरी आणि कार्यालयात धाड टाकली असता राजकीय कार्यकर्त्यांच्या रोषाचा सामना ईडीच्या अधिकाऱ्यांना करावा लागला.

केरळमधील तिरुवनंतपुरम येथे माजी मुख्यमंत्री पी. विजयन यांच्या निवासस्थानी छापा टाकण्यासाठी आलेल्या अंमलबंदी संचालनालयाच्या (ईडी) पथकावर विजयन यांच्या समर्थकांनी हल्ला केला.

१२ सदस्यीय पथकाने आज बेकरी जंक्शन येथील विजयन यांच्या निवासस्थानी छापा टाकला. त्यांच्या मुलीच्या 'एक्झालॉजिक सोल्युशन्स' या आयटी कंपनीशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात हे छापे टाकण्यात आले.

ईडी कारवाईचं हे प्रकरण 'कोचीन मिनरल्स अँड रुटाइल लिमिटेड' (सीएमआरएल) द्वारे केलेल्या मनी लॉंड्रिंगशी संबंधित आहे.

दरम्यान, ईडीच्या अधिकाऱ्यांनी विजयन यांच्या घराजवळ येताच विजयन यांच्या समर्थकांनी ईडीच्या अधिकाऱ्यांची कार अडवली, त्यावर जोरदार हल्लाबोल केला.

संतप्त झालेल्या समर्थकांनी ईडी आणि मोदींविरुद्ध घोषणाबाजी केली, विशेष म्हणजे यावेळी अधिकाऱ्यांच्या कारवर चक्क विटा फेकून मारण्यात आल्याचंही पाहायला मिळालं.

# ऑनलाईन शॉपिंगसाठी आता सरकारी वेबसाईट, हायटेक ई-कॉमर्स पोर्टल लवकरच लॉन्च



**मुंबई(प्रतिनिधी)**–गेल्या काही वर्षांत देशातील खादी क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती झाल्याचं दिसून येतंय. या वाढत्या लोकप्रियतेचा फायदा थेट ग्राहकांना करून देण्यासाठी आणि खादी उत्पादने जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी केंद्र सरकार आता एक मोठे पाऊल उचलत आहे. खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे अध्यक्ष मनोज कुमार यांनी एक मोठी घोषणा करत सांगितलं की, देशात लवकरच खादी उत्पादनांसाठी एक नवीन, आधुनिक आणि हायटेक ई-कॉमर्स पोर्टल लॉन्च केलं जाणार आहे.

गेल्या आर्थिक वर्षात खादी उत्पादनांच्या विक्रीने तब्बल २ लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडल्यानंतर, आता सर्वसामान्य जनतेसाठी ऑनलाईन खरेदीचा एक मोठा आणि दर्जेदार खजाना खुला होणार आहे.

खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे अध्यक्ष मनोज कुमार यांनी या आगामी पोर्टलच्या तांत्रिक फीचर्सबद्दल माहिती देताना सांगितले की, हे पोर्टल पूर्णपणे 'मोबाईल-फर्स्ट' तंत्रज्ञानावर आधारित असेल.

**'शॉप द लुक' सारखे भन्नाट फीचर्स :** या डिजिटल प्लॅटफॉर्मवर ग्राहकांना उत्पादनांचे हाय-रिझोल्यूशन (क्ळसह ठशीश्रींळेप) फोटो, जलद व सुरक्षित ऑनलाईन पेमेंट सुविधा आणि 'शॉप द लुक' यांसारखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आकर्षक फीचर्स मिळतील.

'Gen Z' तरुणांना आकर्षित करण्याचा प्लॅन : या पोर्टलचा मुख्य उद्देश आजच्या आधुनिक तरुण पिढीला म्हणजेच 'जेन जी'ला खादीकडे आकर्षित करणे आणि या अस्सल भारतीय ब्रँडची यशोगाथा संपूर्ण जगासमोर मजबूतपणे मांडणे हा आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये खादी उत्पादनांच्या मागणीत प्रचंड आणि ऐतिहासिक वाढ झाली आहे.

विक्रीत तिप्पट ते चौपट वाढ : खादी उत्पादनांची विक्री १ लाख ८७ हजार १०५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. विशेष म्हणजे, २०१३-१४मध्ये हा आकडा केवळ ३१ हजार १५४ कोटी रुपये इतकाच होता.

पुढील वर्षाचे लक्ष्य : चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये खादी उत्पादनांची एकूण विक्री २.५१ लाख कोटी रुपयांच्या पार जाण्याची भक्कम शक्यता आयोगाने वर्तवली आहे.

खादी आणि ग्रामोद्योग उपक्रमांमुळे देशातील ग्रामीण भागात रोजगाराची मोठी गंगा वाहताना दिसत आहे.

कोटींच्या घरात रोजगार : वर्ष २०१३-१४ मध्ये खादी क्षेत्रात एकूण रोजगार १.३० कोटी इतका होता, जो वर्ष २०२५-२६ मध्ये वाढून थेट २.०४ कोटी झाला आहे. म्हणजेच, २०१३-१४ च्या तुलनेत गेल्या काही वर्षांत खादीच्या माध्यमातून कोट्यवधी हातांना रोजगाराच्या नव्या आणि शाश्वत संधी उपलब्ध झाल्या आहेत.

खादी क्षेत्राला बळकट करण्यात 'पंतप्रधान रोजगार सृजन कार्यक्रम' या योजनेचा सिंहाचा वाटा राहिला आहे.

नवीन उद्योगांची निर्मिती : वर्ष २०२५-२६ मध्ये या कार्यक्रमांतर्गत देशभरात तब्बल ६६ हजार ४९४ नवीन औद्योगिक युनिट्स स्थापन करण्यात आले.

लाखो तरुणांना नोकरी अन् करोडोंची सबसिडी : या नवीन युनिट्सच्या माध्यमातून ७ लाख ३१ हजार ४३४ लोकांना रोजगाराच्या सुवर्णसंधी मिळाल्या आहेत. यासाठी ७ हजार ३७५ कोटी रुपयांच्या कर्जावर सरकारने तब्बल २ हजार ४५७ कोटी रुपयांची मार्जिन मनी सबसिडी लोकांना देऊन थेट आर्थिक मदत केली आहे.


## Change In Name

**My old name is UMREKAR PANDURANG NILKANTH which now I am changing to new name as PANDURANG NILKANTHRAO UMREKAR. Henceforth my all official correspondence will be done as per my new name. Please consider this public declaration. Address -S/O NILKANTHRAO UMREKAR, 37 at WALKI Bk, Post Martala, Tq. Loha, Dist. Nanded Maharashtra-431602**



## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

मुख्य प्रशासकीय इमारत, प्रआयोकक्ष, खोली क्र. १०८.
फोन क्र, २३४४०५ (०२४६२). फॅक्स २३२०७१ (०२४६२), P.B.X. २३४७१०, २३४५७७, २३४४०४
WEBSITE: www.nwcmc.gov.in
जा.क्र./नांवाशमनपा/प्रआयो/१४९/२६ दिनांक: २७/०५/२०२६

### जाहीर प्रगटन

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये स्वतः बांधकाम करणे या घटकांतर्गत मंजुर प्रकल्प १ ते १५ मधील लाभार्थीची यादी यापुर्वीच मनपाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली असुन ७३१६ लाभार्थी यांची कामे पुर्ण झाली असुन ७१८ लाभार्थ्यांची कामे प्रगतीत आहेत. परंतु डीपीआर क्र. १६ साठी ज्या लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अर्ज सादर केला आहे तो डीपीआर योजनेची मुदत संपली असल्याने मंजुर झाला नाही. प्रधानमंत्री आवास योजना १.० या योजनेमध्ये नविन अर्ज स्वीकारले जात नाही. त्याजागी नविन प्रधानमंत्री आवास योजना २.० (शहरी) योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

करीता प्रधानमंत्री आवास योजना १.० मध्ये घरकुल मिळण्यासाठी अर्ज केला परंतु डीपीआरमध्ये नाव मंजुर न झालेल्या लाभार्थ्यांना पुन्हा प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत अर्ज भरणा करावा. सदर अर्ज https://pmaymis.gov.in/PMAYMIS2_2024 / Pmay Default.aspx या वेबसाईटवर ऑनलाईन भरणा करुन कागदपत्रे रुम क्र.१०९, प्रधानमंत्री आवास योजना विभाग, मुख्य प्रशासकीय कार्यालय, मनपा येथे सादर करावे. आपल्या अर्जावर शासन नियमानुसार घरकुल मंजुर करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

अतिरिक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड


# भोंदू अशोक खरातची न्यायालयीन कोठडीत रवानगी



**मुंबई(प्रतिनिधी)**–माहाराष्ट्राला हादरवणाऱ्या भोंदू अशोक खरातची रवानगी आता न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधित कायद्यांतर्गत (पीएमएलए) स्थापन विशेष न्यायालयाने मंगळवारी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) खरात याला वाढीव कोठडी देण्याची मागणी न केल्याने विशेष न्यायालयाने त्याला ९ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

कोठडीची मुदत संपल्याने खरात याला मंगळवारी विशेष न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. मात्र, सध्या त्याच्या वाढीव कोठडीची आवश्यकता नसल्याचे ईडीतर्फे स्पष्ट करण्यात आले. विशेष म्हणजे खरात याने चौकशीत सहकार्य केले नाही आणि उडवाउडवीची उत्तरे दिली, असा दावाही ईडीने एकीकडे केला. भविष्यात खरात याच्या चौकशीची आवश्यकता भासल्यास ती मागण्याबाबतचा अधिकार राखून ठेवत असल्याचे न्यायालयाला सांगितले.

## समृद्धी महामार्गावर इव्ही कार जळून खाक

**मुंबई (प्रतिनिधी)**– समृद्धी महामार्गावर बर्निंग कारचा थरार पहायला मिळाला आहे. सिन्नरहून शिर्डीकडे जाणाऱ्या टाटा नेक्सन इव्ही कारला अचानक आग लागल्याची घटना घडली. बुधवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास कांदळवाडी शिवाराजवळ ही आगीची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र क्षणांतच संपूर्ण कारने पेट घेतल्याने वाहन पूर्णतः जळून खाक झाले आहे.







### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितास या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, दि, टिळकनगर को ऑप हौसींग सोसायटी (म.) नांदेड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड मधील सर्वे नं. ३८ वर ज्याचा सिटी सर्वे नं. ८४४१ आहे ज्याचे मूळ मालक श्री महेश नामदेवराव अंबोरे असून त्यांनी स्वतः श्री साई बिल्डकॉनचे मालक श्री महेश पुंडलिकराव देशमुख वय ४४ वर्षे रा. श्यामनगर नांदेड यांना प्लॉट विकसित करण्याचा करार केलेला आहे. त्यानुसार श्री महेश पुंडलिकराव देशमुख यांनी टिळकनगरमधील प्लॉट नं. ३१ वर साई पद्ममजा रेसीडेन्सी या नावाने इमारत विकसित केलेली आहे.

सदरील साई पद्ममजा रेसीडेन्सी इमारतीमधील पहिल्या माळ्यावरील फ्लॅट नं. २०१ ज्याचा कारपेट एरीया ८०० चौ. फुट एवढा आहे. ज्याची चतु:सिमा येणे प्रमाणे आहे.

पूर्व -प्लॉट नं ८, पश्चिम- ४० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिण- प्लॉट नं ३० आहे व उत्तरेस-प्लॉट नं ३१ चा उर्वरित भाग आहे.

हा फ्लॅट श्री महेश नामदेवराव अंभोरे व श्री महेश पुंडलिकराव देशमुख विकासक यांनी सतीश कोंडबाराव खानसोळे वय ४० वर्षे ता. हदगाव जि.नांदेड यांना रु ४०,००,००० लक्ष (अक्षरी चाळीस लक्ष फक्त) किमतीस कायमचा विक्री केलेला आहे. इसारा पोटी रु८,००,०००/- (अक्षरी आठ लक्ष रुपये फक्त) एवढी रक्कम दि १८/०२/२०२६ रोजी आटीजीएसने श्री महेश नामदेवराव आंभोरे यांना दिलेली आहे.

तरी वरील मालमत्ते सबंधी कोणास काही आक्षेप/उजर मालकी हक्क, देवाण-घेवाण, कुळ, कर्ज, इत्तरही काहीही आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आमच्याकडे लेखी कागदपत्रासह संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचेकडे लेखी आक्षेप, उजर नोंदवावा. मुदतीनंतर आलेला आक्षेप स्वीकारल्या जाणार नाही. तरी साई पद्ममजा रेसीडेन्सीमधील फ्लॅट नं. २०१ श्री सतीश कोंडबाराव खानसोळे यांचे नावावर हस्तांतरीत करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. करीता सदरील जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

अध्यक्ष
टिळकनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नांदेड



### जाहीर प्रगटन

मौजे वजिराबाद ता. जि. नांदेड मनपा हद्दीतील सर्व्हे नं. ६२/३ मधील प्लॉट नं. ४६. ज्याचा सिटी सर्व्हे नं. ४३७८. एकूण साईज ११.०७ मीटर व १५.०० मीटर. एकूण साईज १७५.५ चौरस मीटरचा प्लॉट रंगास्वामी नरसया हरीपुरी व उदयसिंह मनदसिंह रावत रा. सोमेश कॉलनी नांदेड यांचेकडून अजिंक्य उज्ज्वलसिंह राजे निंबाळकर रा. धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉटची चतु:सिमा–**
पूर्वेस -प्लॉट नं. ४१, पश्चिमेस -६ मीटर रुंद रोड,
दक्षिणेस -प्लॉट नं. ४५, उत्तरेस -९ मीटर रुंद रोड.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील फ्लॅटबद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर फ्लॅटचे खरेदीखत अजिंक्य उज्ज्वलसिंह राजे निंबाळकर यांच्या नावे करून घेण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
अजिंक्य उज्ज्वलसिंह राजे निंबाळकर
रा. धाराशिव, ता. जि. धाराशिव
**मो.९६०४४०४२०९, ९७६३६६९१२३**



### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितास या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, दि. टिळकनगर को. ऑप. हौसींग सोसायटी (म.) नांदेड या सोसायटीमध्ये श्री विकास शंकरराव तोटावार यांचे मालकीचा व त्यांचे ताब्यात असलेला प्लॉट नं. ५० आहे. ज्याची चतु:सिमा येणेप्रमाणे आहे.

पूर्वेस : नाईकनगरचा भाग,
पश्चिमेस : ३० फुटाचा रस्ता,
दक्षिण : प्लॉट नं ५१,
उत्तर : प्लॉट नं ४९ आहे.

सदरील चतु:सिमेआतील प्लॉट नं ५० हा श्री विकास शंकरराव तोटावार यांचे नावावरून श्री निलेश विकास तोटावार यांचे नावावर हस्तांतरीत करावयाचा आहे. तरी सदरील प्लॉट नं. ५० च्या हस्तांतरणाबाबत कोणासही कोणताही आक्षेप तथा उजर असल्यास संस्थेच्या अध्यक्षाकडे/सचिवाकडे हे प्रगटन जाहीर झाल्यापासून (७) सात दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह संस्थेकडे आक्षेप तथा उजर सादर करावा. मुदतीनंतर आलेला आक्षेप स्वीकारल्या जाणार नाही. करिता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

अध्यक्ष
टिळकनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नांदेड






## TENDER NOTICE

### SUPPLY & INSTALLATION OF PIGEON SAFETY NET

Sealed quotations/Tenders are invited from experienced Agencies/Vendor for providing and installation Pigeon Safety Nets for departmental work. Work Details: UV Stabilized Nylon/ HDPE Piegeon Net with Locking.

The Vendor shall supply high quality Pigeon Safety Nets Install Nets with necessary fixturs and accessories. Ensuers safe and durable installation, provide Service support.

Vendor should have experience in Pigeon Safety Net installation work, having GST registration, Pan Card, previous work experience.

The last Date of submission of Sealed quotation Dt. 5-06-2026. up to 5.00 pm. during Office hours in favour of Superintendent Gurudwara Sachkhand Board,Nanded

The Authority reserves the Right to Accept or reject the Tender without assigning any reason.

Terms and Conditions :-

1. Rates should include Material, Labour, Transportation and Taxes. 2. These Rates will remain same for Only one Year.

8. Work should be completed within the specified timeline.

Superintendent,
Gurudwara Sachkhand Board,
Nanded.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## नांदेड तालुक्यात कृषी निविष्ठा विक्रेत्यांची खरीप पूर्वतयारी आढावा बैठक





**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड तालुक्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेत्यांची खरीप हंगाम पूर्वतयारी आढावा बैठक जिल्हा असोसिएशन हॉल, नवीन मोंढा, नांदेड येथे नुकतीच पार पडली. कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम २०२६ संदर्भात मार्गदर्शन व आवश्यक सूचना देण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून कृषी निविष्ठा विक्रेत्यांना मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल यांनी सोयाबीन बियाण्यांच्या उगवण तक्रारी टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी जागतिक आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर युरिया व डीएपी खतांचा संभाव्य तुटवडा लक्षात घेऊन आवश्यक नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. तसेच 'अल-निनो'च्या पार्श्वभूमीवर उद्भवू शकणाऱ्या कृषी आपत्कालीन परिस्थितीबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीस कृषी विकास अधिकारी निलकुमार ऐतवडे, जिल्हा परिषद मोहीम अधिकारी सचिन कपाळे, जिगुनिनी अमोल पेकम, कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) सौ. पुनम चोतमल, कृषी अधिकारी (पंचायत समिती, नांदेड) सौ. छाया देशमुख, माफदाचे महासचिव विपीन कासलीवाल तसेच माजी जिल्हाध्यक्ष ओंकार रहाटे उपस्थित होते.

कृषी निविष्ठा संघटनेच्या वतीने विक्रेत्यांच्या विविध समस्यांवर तोडगा काढण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल यांनी केले. बैठकीस कृषी निविष्ठा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सदाशिव पुंड, नांदेड तालुका अध्यक्ष श्रीधरराव नागापूरकर, सचिव श्रीकांत वैद्य यांची विशेष उपस्थिती होती.

या बैठकीस नांदेड तालुक्यातील कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी, कृषी निविष्ठा विक्रेते तसेच अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सतत वीज पुरवठा खंडित होत असल्याने संतप्त नगरसेवकांनी प्रभारी अभियंत्याला दिले निवेदन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– सतत वीज पुरवठा बंद होत असल्याने सिडको-हडको परिसरातील नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका, असा सज्जड इशारा परिसरातील नगरसेवक यांनी महावितरण प्रभारी अभियंता साखरे यांना २७ मे रोजी निवेदन दिले आहे. या आंदोलनाची दखल घेत ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी यांनी कार्यालय परिसरात बंदोबस्त लावला होता.



या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अनेक दिवसांपासून सिडको-हडको भागामध्ये विद्युत विभागाच्या ढिसाळ व निष्काळजी कारभारामुळे दिवस-रात्र वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. यामुळे नागरिक, व्यापारी, विद्यार्थी, बालकांना तसेच ज्येष्ठ नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या गंभीर समस्येची दखल घेत परिसरातील नगरसेवक संजय पाटील घोगरे, उदय देशमुख, वैजनाथ देशमुख, सतिश पाटील बस्वदे, राजू लांडगे तसेच भागातील शिवराज देशमुख, केशव कांबळे, सुमित कोलंबीकर, योगेश हंबर्डे यांच्यासह अनेक नागरिकांनी संबंधित विद्युत विभागाच्या कार्यालयात जाऊन लोकशाही मार्गाने अधिकाऱ्यांना जाब विचारला व तत्काळ कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी केली.

वीज पुरवठ्याबाबत नागरिकांच्या भावना अत्यंत तीव्र असून, यानंतरही रात्री-अपरात्री वीज खंडित होण्याचे प्रकार सुरू राहिल्यास जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल. नागरिकांच्या संयमाचा अंत पाहू नये, अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारावे लागेल, असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. आंदोलनाची दखल घेत ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय शाखेचे बालाजी दंतापल्ले व पोलीस अंमलदार, होमगार्ड यांनी बंदोबस्त ठेवला होता.

## माहूर आणि धर्माबाद येथील अपघातात दोनजण ठार

**नांदेड (प्रतिनिधी)** –माहूर आणि धर्माबाद येथे वेगवेगळ्या दोन अपघातांमध्ये दोघेजण ठार झाल्याच्या घटना दि. २६ मे रोजी उघडकीस आल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहूर येथील एका हॉटेलसमोर भारत किशनराव बेहेरे (वय ६३) राहणार कपिलेश्वर धर्मशाळा माहूर हे दि. २६ मे रोजी पहाटे सहाच्या सुमारास मॉर्निंग वॉक करण्यासाठी बाहेर पडले, परंतु यातील कारचालक धनाजी ज्ञानेश्वर देव (वय २९ राहणार किशोर तालुका कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर) याने आपल्या ताब्यातील कार क्रमांक (एमएच०९-डीजे- ७६ ७६) ने पायी चालणाऱ्या भारत बेहरे यांना जबर धडक दिली. या धडकेत




भारत बेहरे यांचा जागीच मृत्यू झाला. सचिन भारत बेहरे यांच्या फिर्यादीवरून माहूर पोलीस ठाण्यात कारचालक धनाजी देव याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करत आहेत.

तर दुसऱ्या घटनेत धर्माबाद येथील राजेश्वर ट्रेडिंग कंपनीसमोर आंध्रा बस स्थानक येथे राजेश्वर व्यंकटराव पवार (वय ४५ तालुका तानुर जिल्हा निर्मल, तेलंगणा) हे त्यांची दुचाकी क्रमांक (एमएस २६ -प- ०१८८) वरून जात होते. यावेळी त्यांच्या दुचाकीला ट्रक क्रमांक (एपी२५- यू- २२ १३) च्या चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक हयगयी व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवून वरील दुचाकीस्वारास जोराची धडक दिली. या धडकेत राजेश्वर पवार हे जागीच ठार झाले. व्यंकटराव पवार यांच्या फिर्यादीवरून धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती पगलवाड करत आहेत.

## तलवार बाळगणाऱ्या तिघांना सोनखेड पोलिसांनी केली अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– लोंढे सांगवी येथे सोनखेड पोलिसांनी कारवाई करून तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एक तलवार जप्त केली आहे. ही कारवाई २५ मे रोजी रात्री आठ ते नऊच्या दरम्यान करण्यात आली.

लोहा तालुक्यातील लोंढे सांगवी येथील शिवानंद बालाजी शिंदे, गोपीनाथ शिवाजी शिंदे आणि एक अल्पवयीन असे तिघेजण आपल्या ताब्यात विनापरवानगी तलवार घेऊन परिसरात दहशत पसरवीत होते. ही माहिती सोनखेड पोलिसांना मिळताच त्यांनी त्या ठिकाणी जाऊन कारवाई केली आणि तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एक तलवार जप्त केली. पोलीस उपनिरीक्षक अशोक हंबर्डे यांच्या फिर्यादीवरून शिवानंद शिंदे आणि गोपीनाथ शिंदे यांच्याविरुद्ध सोनखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून अल्पवयीन बालकास निरीक्षण गृहाची नोटीस बजावली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार नागरगोजे करत आहेत.

## मधुमालती जोशी स्मृतिदिनानिमित्त रविवारी ईशा देशपांडे यांचे कीर्तन

**नांदेड (प्रतिनिधी)**– संध्याछाया वृद्धाश्रमाच्या संस्थापिका स्मृतिशेष मधुमालती जोशी यांच्या स्मृतिदिनानिमित्त युवा नाट्य कलाकार ईशा देशपांडे यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

बालपणापासूनच कीर्तन व कलेकडे ओढा असणाऱ्या इशा देशपांडे या छोटा पडदा व ललित रंगभूमीवर हरहुन्नरी कलाकार म्हणून नावारुपाला येत आहेत.

यावेळी हार्मोनियमवर दिवाकर मुगटकर व तबल्यावर राघव जोशी यांची साथ लाभणार आहे. रविवार, दि. ३१ मे रोजी सायंकाळी ४ वाजता या कार्यक्रमाचा समारोप माजी मंत्री डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर व ज्येष्ठ कवयित्री डॉ. वृषाली किन्हाळकर यांच्या उपस्थितीत होईल. मालेगाव रोड परिसरातील गजानन महाराज मंदिराजवळील कै. ताराबाई बोधुलाल जैन वृद्धाश्रम येथे होणाऱ्या कार्यक्रमास रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थाध्यक्ष डॉ. प्र. दी. जोशी पाटोदेकर, सचिव सुरेखा पाटणी व संचालक मंडळाने केले आहे.

## अशोकराव पाटील यांचे निधन



**किनवट (प्रतिनिधी)** –येथील ज्येष्ठ नागरिक अशोकराव गणपतराव पाटील (वय ८५) यांचे मंगळवार, दि. २६ मे रोजी रात्री वृद्धापकाळामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. किनवट येथील राघवेंद्र किराणा दुकानचे संचालक विनोद पाटील यांचे ते वडील होत. अशोकराव पाटील यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी येथील कैलास मोक्षधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## दिगांबर वडमिलवार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– देगलूर तालुक्यातील करडखेड येथील निष्ठावंत शेतकरी दिगांबर गंगाराम वडमिलवार यांचे बुधवार, दि. २७ मे रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६२ वर्षाचे होते. कै. दिगांबर वडमिलवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी सकाळी करडखेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.त्यांच्या पश्चात पत्नी, ३ भाऊ, २ मुले, १ मुलगी, सुना, जावाई नातवंडे असा परिवार आहे. डॉ. ज्ञानेश्वर वडमिलवार यांचे ते बंधू होत.

## नांदेड येथे रेल्वे कोच, वंदे भारत, अमृत भारत मेंटेनन्स देखभाल डेपो उभारा -खा. डॉ. गोपछडे

**नांदेड (प्रतिनिधी)** –पुणे-नांदेड तसेच हैदराबाद-नांदेड वंदे भारत सेवा तत्काळ सुरू करावी, हुजूर साहिब नांदेड येथे वंदे भारत आणि अमृत भारत गाड्यांसाठी रेल्वे कोच, वंदे भारत, अमृत भारत मेंटेनन्स देखभाल डेपो उभारण्यात यावे तसेच नांदेड इलेक्ट्रिक लोको ट्रिप शेडचे काम लवकर पूर्ण करण्यात यावे. नांदेड रेल्वे स्थानकावरील रेल्वे पिट लाईन मालटेकडी रेल्वे स्थानकाकडे स्थलांतरित करून मालटेकडी रेल्वे स्थानकाचा सर्व आवश्यक रेल्वे सुविधांसह विकास करावा, अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.

खा. डॉ. अजित गोपछडे यांनी काल दिल्लीत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी मराठवाड्यातील दीर्घकालीन रेल्वे विकासाला, धार्मिक पर्यटनाला,



औद्योगिक प्रगतीला आणि आधुनिक रेल्वे पायाभूत सुविधांना नवी दिशा देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारसमोर रेल्वे विकासाचे व्हिजन मांडले आहे. त्यांनी नांदेड-लातूर रोड तथा नांदेड-बिदर रेल्वे मार्गाच्या कामाला गती देणे, बोधन-बिलोली-नरसी-लातूर रोड (१३४ कि.मी.) सर्वेक्षण झालेल्या रेल्वेमार्गास मंजुरी देणे तसेच आगामी रेल्वे अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्याची मागणी प्रामुख्याने केली. तसेच धर्माबाद रेल्वे स्थानकाचे नामकरण डॉ. केशव बळीराम हेडगेवार रेल्वे स्थानक असे करण्याची विनंतीही केली.

हुजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकाचे जागतिक दर्जाचे, आधुनिक, हरित व पर्यावरणपूरक रेल्वे स्थानक म्हणून विकास करण्याची मागणी करताना त्यांनी स्थानक परिसरात पर्यटक माहिती केंद्र, सौर ऊर्जा प्रणाली, पावसाच्या पाण्याचे संकलन, दोन्ही प्रवेशद्वारांवर उद्याने, कारंजे, सुशोभीकरण, आधुनिक स्वच्छता व्यवस्था, डिजिटल माहिती प्रणाली, मल्टीलेव्हल पार्किंग, स्वतंत्र प्रतीक्षालये आणि उच्च दर्जाच्या प्रवासी सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

## महाराष्ट्र राज्य शासकीय पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेवर मराठवाड्यातून संदीप उदगीरकर यांची निवड

**नांदेड (प्रतिनिधी)**– ठाणे जिल्ह्यातील रांजनोली येथे नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य शासकीय पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या राज्यस्तरीय महाअधिवेशनात नांदेडचे जिल्हाध्यक्ष संदीप उदगीरकर यांची मराठवाड्यातून राज्य कार्यकारिणीवर संचालक म्हणून निवड झाली आहे.



रांजनोली ता.भिवंडी जि.ठाणे येथे महाराष्ट्र राज्य शासकीय पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच पार पडले.

या अधिवेशनात राज्य कार्यकारिणी निवडण्यात आली असून, त्यात अध्यक्ष पदाची माळ नाशिकच्या बाळासाहेब जाधव यांच्या गळ्यात पडली आहे. त्यांची एकमताने निवड झाली. तर संचालक म्हणून नांदेडचे जिल्हाध्यक्ष संदीप उदगीरकर यांची मराठवाड्यातून निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**पान १ वरून...**

**सुप्रीम कोर्टाचा महत्त्वाचा...**

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने या राज्यात एसआयआर मोहीम राबवली होती. त्यामध्ये निवडणूक यादीतील जवळपास ९० लाख मतदारांना वगळण्यात आले होते. या निर्णयानंतर प्रचंड गदारोळ झाला होता. निवडणूक यादीतून नावं वगळण्यात आलेल्यांमध्ये बहुतांश मुस्लीम मतदारांचा समावेश असल्याचा आणि हे जाणीवपूर्वक केल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. यापैकी काही मतदारांना पुन्हा मतदार यादीत सामावून घेण्यात आले होते. मात्र, हे प्रमाण अत्यंत नगण्य होते. यामुळे पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावर प्रभाव पडल्याचा आरोप विरोधकांनी केला होता.

## गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या विशाल भंडारीची एमपीडीए अंतर्गत हर्सुल कारागृहात रवानगी

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर व परिसरात पोलिसांनी सांगितल्यानंतरही आपल्या वर्तणुकीत बदल न करता सतत गुन्हेगारी करत दहशत पसरविणाऱ्या विशाल भंडारी याची अखेर झोपडपट्टी दादा (एमपीडीए) कायद्याअंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. सन २०२६ मधील ही दहावी कारवाई असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड शहरात तसेच जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील गुन्हे अभिलेखावरील सक्रिय तसेच वारंवार गुन्हे करणारे सराईत आरोपीची यादी २+ स्किम अंतर्गत तयार करुन, आरोपी विरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंबंधाने सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत. जिल्ह्यातील गुन्हेगारावर वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करुन देखील त्यांच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणेदाराकडून सराईत गुन्हेगारांना स्थानबद्ध करण्यासंबंधाने एमपीडी प्रस्तावाची कार्यवाही सुरू आहे.

स्थानबद्ध करण्यात आलेला गुन्हेगार विशाल राजू कानोजी ऊर्फ भंडारी याच्याविरुद्ध गैर कायद्याची मंडळी जमवून खुनाचा प्रयत्न करणे, दुखापत करणे, शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, अवैधरित्या शस्त्र ताब्यात बाळगणे व त्याचा वापर करणे असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. एकंदरीत तो गंभीर स्वरुपाचे गुन्हेगारी कृत्य करीत असल्यामुळे भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी सदर गुन्हेगारास एमपीडी अधिनियमाप्रमाणे स्थानबध्द करणे बाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक यांच्याकडे सादर केला होता.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या एआरटी केंद्राच्या उल्लेखनीय कामगिरीचा राज्यस्तरीय गौरव

**नांदेड (प्रतिनिधी)**– शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथील एआरटी केंद्राने एचआयव्ही/एड्स सेवा वितरण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आंध्रप्रदेश येथे आयोजित केंद्रीय आढावा बैठकीमध्ये गुड परफॉर्मन्स इन आरटी सर्व्हीस डिलीव्हरी या मानांकन अंतर्गत महाराष्ट्र राज्यास प्रथम श्रेणीचा सन्मान प्राप्त झाला आहे. या यशामध्ये नांदेड जिल्ह्यातील एआरटी विभागाच्या कार्याची विशेष दखल घेण्यात आली आहे.



या उत्कृष्ट कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या वतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथील एआरटी केंद्राला अधिकृत प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. या प्रशस्तीपत्रात केंद्राच्या उल्लेखनीय कार्याबरोबरच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सामूहिक योगदानाचे कौतुक करण्यात आले आहे. ही यशस्वी कामगिरी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठबळ, दूरदृष्टी आणि प्रभावी नेतृत्वामुळे शक्य झाली आहे. विभागप्रमुख डॉ. शीतल राठोड व वैद्यकीय अधीक्षक डॉ. कापसे यांच्या प्रशासकीय सहकार्याखाली तसेच नोडल अधिकारी डॉ. मोहम्मद उबैदुल्ला खान यांच्या नेतृत्व, नियोजन व समन्वयातून एआरटी केंद्राने उत्कृष्ट सेवा मानके निर्माण केली आहेत.

या यशामध्ये एसएमओ डॉ. प्रदीप जाधव आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे योगदान विशेष उल्लेखनीय ठरले आहे. रुग्णसेवेप्रती असलेली बांधीलकी, संघभावना आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा मानाचा गौरव प्राप्त झाला आहे.

या यशाबद्दल अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, विभागप्रमुख डॉ. शीतल राठोड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. कापसे, नोडल अधिकारी डॉ. मोहम्मद उबैदुल्ला खान, एसएमओ डॉ. प्रदीप जाधव तसेच संपूर्ण एआरटी टीमचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून भविष्यातही उत्कृष्ट सेवा देत नवे मानदंड प्रस्थापित करण्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com